लोकमतविजय,

अथवा

केवळ सुष्ट दुष्ट मनोविकारांचा एक विचित्र खेळ !

अनंत वामन बरवे,

शुकरंभा, प्रतापसिंह, मातृशिक्षाप्रभाव, या नाटकांचे कर्ते

यांणीं रचून तयार केलें.

सन १८९८.

किंमत ४ आणे.

मुंबईत,
"बॉम्बे न्यू प्रेस" मध्यें छापिलें.

अर्पणपत्रक.

ईश्वरी इच्छेनें इंग्लंद व हिंदुस्थान या रा-
ष्ट्रांचा राजा प्रजा या नात्याचा सुदृढ
संबंध जडून जें उभय राष्ट्रांस सुख-
समृद्धिकारक असें राज्यछत्र आ-
म्हावर पसरलें आहे त्यास
मूळ आधारस्तंभ

**औदार्य, समता, न्यायदृष्टि, भूत-
दया, स्वतंत्रशीलता**

इत्यादि आमच्या राजकर्त्यांचे अंगच्या
सर्वश्रुत लोकोत्तर सद्गुणांस

ही अल्पकृति

पूज्यबुद्धीनें अर्पण केली असे.

राष्ट्रजाग्रती अथवा **सुधारणा आत्याबाई**—विचारस्वातंत्र्याची वडील बहीण.

देशाभिमान—विचारस्वातंत्र्याचा मित्र.

एकतंत्र—श्वेतपुरींतील एका प्राचीन राजघराण्यांतील राजकुमार.

उन्माद
दंड
कारस्थान
चित्तक्षोभ } **वगैरे**—एकतंत्राचे स्नेही.

तडिद्वेग—जासूद.

उत्पात—दैन्य, रोग, परचक्र, दुर्भिक्षादिक अनर्थपरंपरा घेऊन आर्यमंडलावर वारंवार येणारा राक्षस.

असंतोष
विक्षोभ
रक्तपात } —देशपार करून लावलेल्या राजद्रोह पुंडाचे आर्यमंडलांत गुप्तपणें संचार करणारे हेर.

(सखी, शिपाई, नागरिकजन वगैरे.)

स्थळ—श्वेतपुरी व आर्यमंडल.

लोकमतविजय,

अथवा

केवळ सुष्टदुष्ट मनोविकारांचा एक विचित्र खेळ !

अंक पहिला.

सूत्रधार (पारिपार्श्वकासह)—

(अनुष्टुप छंद.)

जयोऽस्तुते महाराज्ञि, कीर्तिवैभवशालि-
नी ॥ दीर्घायुरारोग्यमस्तु, जगदीश प्रसादत:॥
आचंद्रार्क असो आह्मावर हें शांतिसा-
म्राज्य ॥ वात्सल्यें आणि औदार्यें, भासो हें
प्रति रामराज्य ॥

(चाल-मंदमंद वायु०)

मंगलवचन स्वरूप सुमनें ॥ अर्पूं निष्ठापूर्वक सुमनें ॥ प्रेमें राष्ट्रियगीत ह्मणूं ॥ हा उत्सव नवसणचि गणूं ॥ तोरणमालांनीं संशोभित ॥ दीपावलिनें करूं प्रकाशित ॥ शृंगारूं सकलस्थानें ॥ मिरवूं प्रतिमा थाटानें ॥ आनंदानें नाचूं गाऊं ॥ प्रेमभरें राणीतें पाहूं ॥ उधळूं अबिर गुलाल फुलें ॥ ......

असंतोष (प्रवेश करून)—

...... वाहवा खाशी भले भले ॥

—महाराज, आतां मात्र कमाल केलीत खरी !

(पारिपार्श्वक जातात.)

सूत्र० (पुढें येऊन)—कांरे बाबा, तुला काय यांत असं चमत्कारिक वाटलं ?

असं०—चमत्कारिक नव्हे तर काय ? अहो, मंगलाचरण ह्मंजे एखाद्या देवतेचं स्मरण; पण तें सोडून आरंभींच हें महाराणीचं स्तोत्रपठण करायचं ह्मंजे, विलक्षणच ह्मणायचं !

सूत्र०—पण राजविभूति तरी ईश्वरांशच असते, हें तुला माहीत नाहीं का ?

(श्लोक.)

'नाऽविष्णु:पृथिवीपति' वचन हें ग्रंथांतरीचें असे ॥ जेथें वैभव आणि कीर्ति बल हीं ईशत्व तेथें वसे ॥ देती भूपतिला निजांशहि तसे इंद्रादि दिग्पालही ॥ कां आद्यस्तुति पात्र तूं न ह्मणसी ऐशा विभूतीसही ॥

असं०—मग इतकं कशाला ? अशा रीतीनं तुह्मी आम्ही हेहि सारे लोक ईश्वराचेच अंश आहोंत असं मी सुद्धां तुम्हांला सिद्ध करून देईन. मग आपलीच आपण स्तुति करणं, हेंहि मंगलाचरणच म्हणावं !

सूत्र०—(एकीकडे)—हा खचित कोणी पाखांडी दिसतो.

असं०—(एकीकडे)—पण नाहीं कोण म्हणतो ? प्रसिद्ध जो राजद्रोहपुंड, त्याचा गुप्त हेर मी असंतोष, तोच तर हा बोलतो !

सूत्र०—अरे, तुझ्याशीं वाद करायला मला आतां वेळ नाहीं. इतकंच ऐक ह्मजे झालं.—

(चाल—तों तनन वाज०—)

शतवर्षें झालीं आज ॥ घेउनियां पद्साम्राज्य ॥ ह्मणुनी हा सकलसमाज ॥ चहूंकडे करि राज्ञिमहोत्सव तेंच सुखप्रद पाहशील तूं इथेंहि मंगलकाज ॥ शत० ॥

—त्या आनंदसमुद्राचं मनोहर दर्शन घेण्याची इच्छा असल्यास मजबरोबर चल. (जातो.)

असंतो० (आपल्याशींच)—नको, नको महाराज, मेहेरबानी करा, आन् आपणच जाऊन त्या समुद्रांत तरा, नाहीं त खुशाल बुडून मरा; मला हे तुमचे वेडेचार ऐकायलाहि नकोत, मग पाहण्याची इच्छा कुठली ? हं:, खुळे खरे या आर्यमंडलांतील लोक ! ह्मणे राणीनं साम्राज्यपद धारण केल्याला आज शंभर वर्षं झालीं, ह्मणून येथल्या या सर्व प्रजेच्या आनंदसमुद्राला ही मोठी भरती आली ! पण, मी विचारतों, शंभर सोडून अशीं हजार वर्षं असतीं

गेली, तरी एवढा महोत्सव याप्रजेनं मानण्यासारखी यांची काय अशी महती दिसणार वाढली! अजून एखादी महत्वाची देणगी तरी? उलटें, जिंकिलेले, रानटी, गर्भदास हेच शिक्के प्रसंगीं कपाळीं बसून एखादवेळीं उगाच कुठं वर होऊं लागणारं यांचं डोकं, पूर्वी पेक्षां अधिक जोरानं पुन: खालीं दडपलं जातंच कीं नाहीं!—हो, पण नाहीं ह्मणायाला या प्रजेला एक स्वतंत्र प्रतिनिधि म्हणून विचारस्वातंत्र्य नांवाचं एक बाहुलं मिळालं आहे खरं! अन् असले हे सर्व खेळ त्याच्याच शिकवणीचे असतात. हं, खेळा, चालूं द्या. आपल्या अशा लाचारस्थितींतहि तुह्माला खेळच सूचत असले तर खुश्शाल खेळा, बाबांनो. पण सांगून ठेवतों, या मतलबी जगांत, तुमच्यासारख्यांना ऊर्जित दशेला येण्याचा मार्ग, त्या नेभळ्या विचार-स्वातंत्र्याचे नादानं तुम्ही हा जो नादानपणाचा पत्कारला आहे तो मात्र नव्हे, हें खूप समजून असा. त्याला ह्मटलं ह्मंजे आमचे राजद्रोह नाईक सांग—पण जाऊं द्या. हे आमचे विचार यांना विषारी वाटतात,

आन् त्यामुळं तर त्या विचारस्वातंत्र्यानं राणी विजयिनीकडे आमची चहाडी करून आम्हाला या देशांतून एकदम हद्दपार करविलं आहे. नाहीं पेक्षां असं तोंड झांकून आम्हाला इथं कां फिरावं लागतं ? ठीक आहे. आम्हाला उघड वागण्याची इथं चोरी होऊन कसाहि गुप्तसंचार करण्याची पाळी आली असली, तरी, त्या विचारस्वातंत्र्याला ह्मणावं, तुह्मा आह्मी तळी लौकरच उचलल्या वांचून कधींहि सोडणार नाहीं. ही आजचीच कामगिरी सुरेख बजावली कीं, तो त्याच्या विपत्तीचा आरंभच !—(पाहून)—कोण ? विक्षोभ ? बरा आला लौकर. कसं कायरे ? कुठं आहे बरं ती पोर यावेळीं.

विक्षोभ– (प्रवेश करून) –विचारस्वातंत्र्याचे पुण्याश्रमाभोंवतालच्या बागेंत ती आपल्या मैत्रिणींना घेऊन खेळायला गेली आहे असं ऐकतों.

असं०–वः, मग तर तिला पळवायला अशी संधि फारच उत्तम ! या वेळीं हे सारे लोक या उत्सवाच्या

वेडांत मारे रंगून गेले आहेत ! काय सांगू विक्षोभा ती पोर पण पोर आहे. मोठ्ठी सुलक्षणी. विचारस्वातंत्र्याची ही एवढी महती सर्व कांहीं त्याच्या या राजनिष्ठा मुलीच्याच पायगुणावर बघ. असलं रत्न आणून आपल्या दुर्गती देवीला अर्पण करावं, म्हंजे ती विशेष सुप्रसन्न होऊन आपला हेतु त्वरित सिद्धीस नेईल, म्हणून मी नायकांच्या मागं किती दिवस लागलों होतों; पण आतां कुठं त्यांच्या मनांत येऊन त्यांनीं ही कामगिरी आज सांगितली आहे.

विक्षो०–पण आतांहि ती अशी झटपट बजावल्यास विचारस्वातंत्र्यावर आपला सूड उगवण्याचं नायकांचं काम होऊन आपल्याला इनाम मिळलच !

असं०–(एकीकडे)–पण राजानिष्ठेला पळवण्यांत माझा हेतु वेगळाच आहे, तो कुठें याला माहीत ! (उघड) बरं तर चल. बागेंत गेली आहे म्हणतोस ना ? तिकडेंच जाऊं. (जातात.)

प्रवेश दुसरा.

(स्थळ, बाग-पात्रें, राजनिष्ठा, शांता व इतर मुली. हांसत खिदळत येतात. राष्ट्र जाग्रती ऊर्फ सुधारणा आत्याबाईही त्यांच्या बरोबर आहेत.)

सर्व मुली (पुढील पद्यांतील मतलबाप्रमाणें अभिनय करीत प्रवेश करितात.)—

(चाल-गौरीहरा श्रीशंक०)

चलाचला ॥ जाऊं चला ॥ खेळायला ॥ बागेमध्यें ॥ साऱ्याजणी ॥ छप्पापाणी ॥ चलचल चकूं गडे तुजवर राज्य ॥ सावध व्हा ॥ टाळी पहा ॥ धरधर धरधर धरधर धरधर धर ॥ ॥ पुरें करूं ॥ आतां फिरूं ॥ फेर धरूं ॥ रंग भरूं ॥ गाणीं म्हणूं ॥ गोफ विणूं ॥ कुंजवनांतिल गोपी जणू ॥ हळू हळू ॥ टिपऱ्या खेळूं ॥ एकदोन तीनचार पांच सहासात आठनऊ ॥ ......

(राजनिष्ठा व शांती आत्याबाईस घेऊन)

...... हात धरा ॥ पुढें सरा ॥ खेळूं जरा ॥ दोघीजणी ॥ बहिणीबहिणी ॥ धाऊं पळूं ॥ कुत्रं का मांजर शिवतं बघूं ॥ आत्याबाई ॥ आम्ही नाहीं ॥ गरगर गरगर गर गरगर गरगर ॥

(आत्याबाईना मुली फिरीवतात, हंसतात)

आत्या०–अग नको गडे. मला किनई भोंवळ करते बरं का? ऐक बये राजानिष्ठे, हा धांगडधिंगा पुरे. मी कांहीं लहान नाहीं, तुमच्या सारखी दुडदुड धांवायला !

राजानिष्ठा–तर मग आम्ही पालखी करतों. तुम्ही बसा तींत आन् आम्ही तुम्हाला गाणीं म्हणत या बागेमधें फिरवूं गडे ! अं ?

सर्व मुली—(टाळ्या वाजवून)—हां हां ! पालखी, पालखी !——

(चाल–भूपती खरे ते०)

हां करूं गडे पालखी अशी, हाताची ॥

मिरवणूक काढूं सुधारणा आतेची ॥ गाऊन मर्जेचीं गाणिं वाजवूं टाळ्या ॥ चवऱ्याच तशा झाडांच्या वारूं डहाळ्या ॥ धरूं छत्री हीवर कमलांच्या पानांची ॥ मिरव० ॥

आत्या०–मला नाहीं ती आतां पालखीबिलखी सोसत. कांहीं तरी मेलं बसून खेळायचं काढा, तुह्मी दिखील मघापासनं अशा एकसारख्या खिदळतांना दमून गेल्या असाल, नव्हे का !

सर्व मुली–आम्ही नाहीं दमलों.

आत्याबा०–अग ह्मणून काय झालं ? घटकाभर बसून नाहीं का खेळतां येत ? या मी भोग्या होत्यें, आन् तुम्ही लपायला जा.

सर्व मुली (मोठ्यानें हंसून)–आहाहाहाहा ! हा बसूनचा खेळ काढलात वाटतं ?

शांती–अग किनई आमच्या आत्याबाईना बसायला पाह्यजेय हो.

राजनिष्ठा–हें बघ शांते, मला एक गंमत आठवली आहे.

शांती–ती काय बरं ?

राजनि॰–आत्याबाई, तुह्माला बसायला हवं ना? बसा तर मग, तुम्ही या चौथऱ्यावर. तुम्हाला गडे आमच्या महाराणी करूं, आन् आम्ही तुमच्या भोंवती फेर धरूं, टिपऱ्या खेळूं–

शांती–झालं ह्मटलं तर तुह्माला फुलांच्या माळा घालूं–

सर्व मुली–तुमच्यावर अबीर गुलाल फुलं उधळूं.

आत्या॰– असं कांहीं कराल तर मग मी नाहीं बसायची, सांगत्यें.

शांती– बरं, नुसत्या तर बसाल ! चला. (आत्याबाईना चौथऱ्यावर बसवून) हं, अशाच बसा.

राजनिष्ठा– शांते, गडे आत्याबाई कशा हुबेहुब महाराणी सारख्याच दिसतात नाहीं बरं ? मी आपली चित्रावरनं ह्मणत्यें, पण आपला दादा आतां श्वेतपुरीहून प्रत्यक्षच पाहून येईल, तेव्हां तो दिखील बघ असंच सांगेल–

(कामदावृत्ताची चाल०)

वृद्ध ह्या तशा असति भव्यही ॥ नाहिं बघ उणें राजतेजही ॥ पूज्य सेव्य ह्या सर्व मानितों ॥ वचनिं यांचिया दक्ष राहतों ॥

शांती– गडे पण एक कमी आहे यांना यांच्या डोकीला मुकूट नकोका ?

सर्व मुली– मग देऊं आह्मी फुलांचा करून !

आत्याबा०– हें काय ग तुमचें ?

राजनि०– अग असूया. तशाच त्या बसतील. चला. आपण त्यांच्या भोंवतीं फेर धरून फिरूं–

(चाल–तुझे मोरी कसम०)

जय भाग्यशालिनी राज्ञिविजयिनी देवी ॥ यशकीर्ति विभव संमूर्ति निजमन प्रांगणीं वसो ॥ तीतें ॥ प्रभो तूं ॥ सदां सुखि ठेवी ॥

(पुढील पद्य ह्मणून टिपऱ्या खेळतात.)

(चाल–जा हरिला तुह्मि०)

हा पहा श्रीराज्ञि महोत्सव दिनशत वार्षिक पातला ॥ भाव लोपुनी तदितर सारे ॥

हर्ष एक हृद्यांतला ॥ बहु मातला ॥ ध्वजा पताकादिक शुभचिन्हें ॥ रुचिर नटवुनी वसतिस्थानें ॥ होउनि भूषित वस्त्राभरणें ॥ थाट असा करुनी मिरवे नरनारीगण नगरांतला ॥ भावलो० ॥

(विचारस्वातंत्र्य व मुद्रणकला येतात.)

विचार०—प्रिये, पाहिलंस का हें—

(चाल—मोरे काननुमें०)

किती आनंदें उपवनिं आज विहरति सकल मुली ॥ कि० ॥ गाति नाचती मिळुनि साजणी ॥ स्वच्छंदें ॥ उपवनिं० ॥ करिति परस्पर बालचेष्टितें ॥ निर्बंधें ॥ उपव० ॥

मुद्रणकला—खरंच. मला वाटतं—

(चाल—आज शाम मो०)

चाललला असेल आज उत्सव जो चहुंकडे॥
त्याची ही सर्व एथ प्रतिमा लघु दृष्टि पडे ॥
अधिंच मनोल्हादक अति उत्सव प्रसंग हा॥
या लहान आकृतिनें रम्य तो किती पहा ॥

—अगबाई, वन्सं दिखील यांच्यांतच आहेत ! त्या पाह्यल्यात का ?

राजनि०—आई, चल तुला दाखवत्यें. आत्याबाईना आम्ही किनई महाराणी करून बशविलं आहे त्या बघ.

शांती—हा मेल्यांनो, यांना तर झोंप दिखील लागली कि इतक्यांत ! उठवूं कां ?

मुद्रणकला—अग राहूं द्या. नका त्यांना त्रास देऊं. तुमच्यांत त्या येऊन बसल्या आहेत एवढंच पुष्कळ झालं. म्हाताऱ्या माणसांना आपण फार त्रास देऊं नये बरं !——

(चाल—फुलें सुवासिक हीं.)

स्वस्थ अशा बसल्या जरी ह्या ॥ शिशुपर्णी खेळल्या तशा अझुनि तुह्मि नसाल मुळिं शिकल्या ॥ स्वस्थ० ॥ या कंपित हातें सुकृतचि बहु घडलें ॥ हें स्खलन पावन पद न चुकुनि पडलें ॥ हे मंद नेत्र नच कुवस्तु-

वरि जडलें ॥ ह्मणुनिया वयावेंरी टिकल्या ॥ तुह्मि नका त्रासवूं त्यांस खचित त्या दिसति बहुत थकल्या ॥

राजानि०—पण आह्मी नाहींच मुळीं त्यांना त्रास देत. त्यांच्या भोंतीं भोंतींच खेळतों.

विचार स्वा०—प्रिये, आपल्यालाहि घटकाभर दुसरीकडेच गेलं पाहिजे. नाहीं तर आपल्यामुळं यांना यथेच्छ खेळायला इथं संकोच वाटेल.——

(चाल—तुझी अन्यथा ती०)

न द्यावा तुह्मा त्रास त्यांनीं जसा ॥ तया तूमचाही न व्हावा तसा ॥ असो पूज्यता त्यांसि तुह्माविशीं ॥ तुह्मालाहि वात्सल्य बुद्धी तशी ॥ (दोघें जातात.)

शांती—मला वाटतं आपण आतां दुसराच कांहीं खेळ काढूं या.

राजनिष्ठा—नाहीं तर चला गडे, आपण बागेंतलीं फुलंच तोडूं या.

सर्व मुली–हो हो ! हें बरं. आम्ही देतों भराभर फुलं वेंचून. आन् तुम्ही दोघी त्यांच्या माळा गुंफायला इथंच बसा.—

(चाल–चल जाऊं झडक०)

फुलें चलाग वेंचूं या ॥ गुंफुनि वेणित खोंचूं या ॥ हार तुरे ॥ करु गजरे ॥ नटुनि अशा मग नाचूं या ॥ फु० ॥ कळे फुलांचे तोडूं या ॥ सुरेख ते मग जोडूं या ॥ मोत्यांचे ॥ परि त्यांचे ॥ गेंद शिरीं मग मिरवूं या ॥ फुलें० ॥

(वेगवेगळ्या नाचत निघून जातात.)

शांती–गडे राजनिष्ठे, चल तंवर आपण त्या कारंजाकडे जाऊं या.

(एकीकडे होतात. दुसरी कडून विक्षोभाला घेऊन असंतोष येतो.)

असंतो०–हं, त्या बघ.

विक्षोभ०–अरे पण, यांतली आपल्याला पाह्यजेय ती राजनिष्ठा कोणची ?

असंतो०—ती. दुसरीच्या खांद्यावर हात ठेवून मोठ्या झोंकानं कारंजाकडे पहात उभी आहे ती. हें पहा, यावेळीं इथं कुणी नाहीं. झट्कन पुढें होऊन एकदम उचल.

विक्षोभ०—पण ती दुसरीं ?

असंतो०—ती गडबड करील, तर तिचा बंदोबस्त लागला मजकडे. चल आटप. (आत्याबाईस पाहून) हां पहा. ही थेरडी इकडे चळवळ करायला लागली. हं. होच पुढें.

(विक्षोभ राजनिष्ठला एकदम उचलून पळून जातो व शांती गडबड करूं लागतेशी पाहून तिला गोळीनें ठार करून असंतोष पळून जातो. इकडे आवाज़ाच्या दणक्यानें आत्याबाई चौथऱ्यावरून पडतात.)

आत्या०—अग अगाई आई ! मेल्यें हो मेल्यें मी ! मारलं मला ! अहो धांवा हो धांवा तरी कुणी !

सर्वमुली०—आत्याबाई, आत्याबाई, अहो झालंय तरी काय ?

आत्याबाई०—तुम्हीच टवळींनीं मला या चौथ-ऱ्यावरनं खालीं ढकलून पाडलंत आन् आतां मोठ्या साळसूदपणानं "कायहो झालंय" म्हणून मला विचारताहेत. कसा माझा चांगला डोळा लागला होता पण !

सर्वमुली०—अहोपण आह्मी—(शांतीकडे नजर जाऊन)—अगबाई ! पण ही शांती इथं अशी कां पडली आहे ? आन् राजनिष्ठा कुठे गेली ? आत्याबाई, पहा हो हिला. जाग, कुणी तरी त्या कारंजांतलं लौकर पाणी घेऊन या कसं.

आत्याबाई—काय म्हणतां ? शांती इथं पडली आहे ? तर मग तिचंच सटवीचं हें काम ! मला ढक-लून देऊन आपण असं सोंग केलंय तिनं. थांब ह्मणावं. (उठून पुढें येतात.)

सर्वमुली—नाहीं हो आत्याबाई, हें सोंग नव्हे. आतां आवाज नाहीं का ऐकला आह्मी ? खचित कुणी दुष्टानं हिला मारून आमच्या राजनिष्ठेला नेली !

आत्याबाई–(जवळ येऊन) आं ? खरंच, ग खरं. अरे देवा देवा ! शांते शांते, बेटा ऊठ. गेलीच ती. कशी सोन्यासारखी पोर बरं का ?

(विचारस्वातंत्र्य व मुद्रणकला घाबऱ्या घाबऱ्या येतात)

विचार०–होय. इकडेच आवाज ऐकला. त्या पहा. साऱ्या मुली तिथं जमल्या आहेत. कांहीं तरी अपघात झालाय खचित !

आत्याबाई–बा विचारा, ही पाह्यलीस कारे शांतीची काय अवस्था झालीय ती ! गेली, गेली बाबा, शांती आपल्याला सोडून गेली !

मुद्रणकला०–(शांतीच्या अंगावर पडून)– अगबाई !

(चाल–मैंहूं जानतोथी प०)

गेली बाइ ही त्यजून शांति लाडकी अहा ॥ गे० ॥ मूर्त सुप्रसन्नता प्रकट संभवा॥ सौख्यराशि ही गृहासि रत्नदीपिका ॥ गे०॥

विचार०–(मुलींस) अग पण राजनिष्ठा कुठे आहे ?

आंत्या०—मला तें कांहीं ठाऊक नाहीं. आवाजाच्या दणक्यानें मी धडपडून जागी झाल्यें, आनू पहाल्यें तों हा प्रकार ! (मुलींना) अग जाग; तिला पहा इकडे तिकडे. भीतीनं पोर कुठं लपून बसली असेल. जा. कशा मेल्या ऐदी आहेत पहा. हलतायत का पण ?

सर्व मुली—आत्याबाई, आमच्यावर रागावूं नका. आह्मी सारी बाग धुंडली. राजनिष्ठचा कुठें ठिकाण नाहीं.

विचार०—आलं माझ्या लक्ष्यांत. दागिन्याच्या लोभानं ह्मणा, किंवा दुसऱ्या कशानं म्हणा. यांच्या पाळतीवर असलेल्या कुणी दुष्टानं तिला उचलून नेली खाचित. ह्या पोरीनं कांहीं गडबड केली असेल तेव्हां हिचा असा घात करून तो गेला.

मुद्रण०—मग धांवा हो धांवा. चहुंकडे माणसं पाठवा. अझुनी कांहीं तो लांब गेला नसेल !

विचार०—कसं करावं. मोठं संकट आलं आहे. ही दुःख वार्ता आतांच शहरामध्यें पसरूं दिली, तर

सर्वांच्या या महोत्सवाचा एकदम विरस होईल.—पण छे. मी आपल्या कार्यासाठीं इतरांच्या आनंदाचा असा भंग करणार नाहीं. बेहेत्तर आहे—

(आर्या)

दुहिताच काय परि कसल्याहि स्वहिता सुखेंचि सोडीन ॥ ही काय एक असुता ल्यसुता स्थिति ही परार्थ जोडीन ॥

—तर मग बोभाटा न करतां तूर्त आपला आपणच पोरींचा शोध करावा. हळुहळू ही गोष्ट लोकांत पसरल्यावर मग काय होईल तें होवो !

मुद्रण क०—पण प्राणनाथ, राजनिष्ठेसारखी पोर घालीवल्यानं कांहीं बरं होणार नाहीं.

(श्लोक–भैरवींत)

जातांच पेशी निजराजनिष्ठा ॥ तत्काळ झाली प्रिय शांति नष्टा ॥ यांच्या अभावीं न कळे किती ते ॥ एकेक उत्पातचि येति येथें॥

विचार स्वा०—प्रिये,—

(श्लोक. जातकी मम शकुं० या चालीवर)

गेल्या जावो प्रियतम जरी आपुल्या दोन्हि कन्या ॥ इच्छा माझी तिळहि न घडो त्यामुळें त्रास अन्या ॥ सोसूं धैर्यें सखि पुढिल ते केवढेही अनर्थ ॥ चिंता आहे प्रभुस अमुची काळजी ती किमर्थ ॥

आत्याबा०—राजनिष्ठा गेलेली पुनः आपल्याला मिळण्याचा अझुनी संभव तरी आहे. पण ही शांती मात्र अगदींच आपल्याला सोडून गेली खरी !

विचारस्वातं०—अग ताई—

(दिंडी—भैरवींत.)

जातसे ही प्रभुजवळ अतां शांती ॥ करावी ती कासया तिची खंती ॥ कृपा त्याची होईल पुन्हा जेव्हां ॥ ब शांतिस निश्चयें सकल तेव्हां ॥

मुद्रण०—(गहिंवरून)—

(चाल—अएसरवर बरतर०)

असुनि सुदिन हा दुर्दिन आह्मा हाय कसा झाला ॥........

विचार०—

......हां हां ॥ हें काय धीर धर ॥ रडूं नकोस ॥............

सर्वमुली—

......दोघीही मैत्रिणी ॥ गेल्याकीं टाकूनी॥ आह्मी अभागिणी ॥ बैसलों होवोनी ॥ जन्माची कहाणी ॥ होईल ही ॥.........

विचार०—

......विधिलिखित न कधिहि टळत मिळत सुखासुख तयापरि ॥........

आत्या०—

......गोष्ट खरी ॥.........

सर्वजण—

......असुनि सुदिन हा० ॥

(पडदा पडतो.)

प्रवेश तिसरा.

(स्थळ—तुरुंग; मूर्छित असलेल्या राजनिष्ठेस घेऊन विक्षोभ येतो. व त्याचे मागून त्याला नकळत असंतोष येतो.)

विक्षोभ–(राजनिष्ठेला ठेवून; आपल्याशीं)—या कामगिरीचें बक्षिस आपण एकटे मिळविणार !

असंतो०–(आपल्याशीं)–या चोरून आणलेल्या वस्तूचा आपण एकदां तरी उपभोग घेणार !

विक्षोभ–(आपल्याशीं)–काय श्रम पडले मला!

असंतो०–(आपल्याशीं)–किती दिवस होता माझा डोळा !

विक्षोभ–(आपल्याशीं)–कामगिरी पण खाशी बजावली !

असंतो०—(आपल्याशीं)—सोनं पण बावन कशी आहे !

विक्षोभ–(आपल्याशीं) आमचे नाईक दुर्गती देवीला आतां हा बळि देणार !

असं०–(आपल्याशीं) आपल्याच मनोवासना देवीला आधीं अस्मादिक हा बळि घेणार !

विक्षोभ–(आपल्याशीं) तोंपर्यंत ही आतां या तुरुंगांत रहायची !

असं०–(आपल्याशीं) आमची इच्छा आधीं या तुरुंगांतच सफल व्हायची !

विक्षोभ–(आपल्याशीं) अरेरे ! विचारस्वातंत्र्याचे कुळांतली मोठ्या पायगुणाची ही राजनिष्ठा या आर्यमंडलांतनं आतां नष्ट होणार !

असं०–(आपल्याशीं) निदान आपण हिला भ्रष्ट तरी करून ठेवणार !

विक्षोभ–(आपल्याशीं) असो, नायकांच्या आज्ञेप्रमाणं हिला इथें आणून ठेविली, तेव्हां तूर्त आपली कामगिरी संपली. (जातो.)

असं०–वाटेनं ओरडआरड करूं नये ह्मणून हिजवर टाकलेल्या औषधाची गुंगी उतरून ही सावध होऊं लागली, तेव्हां आपल्या कामगिरीस आतांच सुरवात झाली ! (एकीकडे उभा रहातो.)

राजनिष्ठा--(सावध होऊन आपल्याशीं)

(चाल--नृपालकोपशांत०)

जवळि कोणि मैत्रिणी न मी कुठें ॥ भास बंदिवास साच हा इथें ॥ अंधकार जामिन गार दार बंद तें ॥ हाय हाय काय पाहत्यें ॥ जव० ॥

असं०-(पुढें होऊन) हवा असल्यास मी जवळ येतों.

राजनिष्ठा (चपापून)--"मी जवळ येतों' म्हंजे ? तूं कोण ?

असंतो०--सांगितलंच तर ओळख पटण्यासारखी आहे. ईर्षा ईर्षा म्हणून तुला कुणी माहीत आहे का ?

राजनि०--होय. ती एक माझी मैत्रिणच आहे आम्ही आत्तां सगळ्या जणी आमच्या पुण्याश्रमाभोंतालच्या बागेंत खेळत होतों.

असंतो०--तर मग तिचाच सख्खा भाऊ मी !

राजनिष्ठा०--कोण ? असंतोष का तूं ? लहानपणापासूनच वाईट लोकांच्या संगतीनं बिघडलेला

आणि त्या मेल्या राजद्रोहाबरोबरच या आर्यमंडलांतनं आमच्या बाबांनीं हद्दपार करवून घालवलेला---

असंतो० (मधेंच)--होय. आन् आज किती दिवसापासून तुझ्या प्राप्तीसाठीं ज्यानं अचाट प्रयत्न चालवलेला, पण आज मात्र ज्याचा तो प्रयत्नांकूर असा हा पालवलेला तो मी असंतोषच बरं !

राजनिष्ठा-(धीर खचून)-हारे देवा ! याच्या का हातांत सांपडल्यें मी ? तर मग---

(चाल-जातसें पतिसदनीं०)

सुगति कांहीं पुढति नाहीं चिन्ह कठि णचि दीसतें ॥ नष्ट किंवा भ्रष्ट व्हावें हेंच उरलें भासतें ॥ जाउं गेले प्राण परि तो स्पर्श दुर्गतिचा नको ॥ भ्रष्टवार्ता कष्टकर म-त्पितर तिकडे नायको ॥ सुग० ॥

असंतो०-कशी खुळी पोर आहे, पहा. अग, तुला दुर्गतिचा स्पर्श नको असला तर मुकाट्यानं मला वश हो. मी तिचं दर्शनही तुला करीवणार नाहीं, मग स्पर्शाची गोष्ट कशाला ? पण हे बघ. माझे जर हेतु

पूर्ण न करशील, तर त्या आमच्या दुर्गती देवीलाच बळी पडशील. आमच्या नायकांनीं त्या करतांच तुला इकडे आणून या बंदींत ठेविली आहे, समजलीस?

राजनि०—काय म्हणतोस ! तुझ्या दुर्वासनेला मी मान्य झालें, तर माझी दुर्गति टळेल ?

असंतो०—अलबत्त !

राजनिष्ठा—आन् मान्य नाहीं झालें तर मला दुर्गति मिळेल ?

असंतो०—लौकरच हें कळेल !

राजनिष्ठा—हें तर मोठं आश्चर्य आहे ! परमेश्वरा—

(चाल—क्या सुझाने रंगेजि०)

अंति दुर्गति मिळेल मज कां ॥ आर्यमंडलीं आर्यकुलीं मम ॥ जन्म, अनार्यहि कर्म ॥ नसुनि कां अं० ॥

असंतो०—हेंबघ तुझें हें भजन ऐकायला मला वेळ नाहीं.

राजनिष्ठा—पण माझा वेळ आतां ईश्वर भजनावांचून जायचाच नाही.

वसंतो०—असं का ? तर मग चालूं दे तुझं भजन (एकीकडे) ही इतक्यांतच कांहीं वळायची नाहीं. परं या कांहीं दिवस अशीच. चांगले हाल झाले म्हंजे आपोआप वेताबर येईल. (पाहून) हा कोण ? विक्षोभ मला शोधतोय वाटतं. पुन: कांहीं नायकांची कामगिरी आहेशी दिसते. चला तिकडेच त्याला भेटूं या. (जातो.)

राजनि०—हा: ! आतां माझी गत काय होणार ? पण हें काय ? अरक्षितांचा आश्रय जो परमेश्वर, त्याचं चिंतन सोडून हे विचार कशाला—

(चाल—प्रियेविण मजला०)

शरण प्रभो मी तव चरणाला ॥ सुखद विषय तूं संस्मरणाला ॥ शर० ॥ दीन जनावनदक्ष सदां तूं ॥ उपेक्षिशिल नच मज अबलेला ॥ शर० ॥

(पडदा पडतो.)

प्रवेश चवथा.

(स्थळ, श्वेतपुरी---पात्रें, राजकुमार एकतंत्र व त्याचा उन्माद.)

एकतंत्र–(कागद देऊन)—काय ? मिळाला राणी विजयिनीचा हुकूम ? ठीक आहे. आतां जसा मोठ्या फुशारकीनं हा मिळविला आहे तश्शाच बहादुरीनं याची बजावणी करून आर्यमंडल देशावर वारंवार येणाऱ्या जनपद विध्वंसक अनेक अरिष्टांतून तूं तेथल्या अडाणी लोकांची पूर्ण सुटका केली पाहि-जेस. यांत नांव मिळीवलं तर आपला फार दिवसांचा हेतू आहे, त्याप्रमाणं तेथल्या राजप्रतिनिधित्वाचा कुलमुखत्यार आपल्या मंडळीचे हातीं आलाच म्हणून समज. एवढ्याकरतां सांगतों, कीं, तो उत्पात राक्षस आपली दैन्य रोग दुर्भिक्ष्य परचक्रादिक अनर्थ परंपरा घेऊन त्या देशावर यावेळीं जाऊन पोंचण्यापूर्वींच तूं त्याच्या प्रतिकारासाठीं जय्यत तयारीनें तेथें जाऊन जर रहा, समजलास ?

उन्माद–बरं आहे. तसंच करतो.

एकतंत्र—पण थांब; हें पहा. या कामगिरींत त्या विचारस्वातंत्र्याला मात्र आपल्या यशाचा किंचित् सुद्धां वांटेकरी होऊं देऊं नकोस त्यानं नुकत्याच संपलेल्या या महोत्सवाचे निमित्तानं आपला मुलगा लोकमत यास महाराणीच्या मुलाखतीला पाठवून इकडचा सर्व दरबार बहुतेक आपलासा करण्याची खूप शिकस्त चालविली आहे. महाराणीनं आपल्या दुरच्या संबंधांतली मुद्रणकला देऊन अर्धीच त्याला आपल्या बऱ्याच लोभांतला करून ठेवला आहे, आणखी असा दरबारहि त्याचा झाला म्हणजे आपल्या महत्वाकांक्षेला हें मोठं विघ्नच ह्मणायचं. त्यामुळं जाणारी ह्मणून सांगतों कीं, प्रसंगाला त्याचा कांहीं एक उपयोग नाहीं, उलटें, सुरळित चालणाऱ्या आपल्या शासनपद्धतीला त्याचे पासून घोटाळा व प्रतिबंध मात्र होतो, असं जर दरबारच्या यावेळीं प्रत्ययास आणून देतां आलं, तर फारच उत्तम! निदान उत्पातादि कठिण प्रसंगांत तरी त्यांचं साह्य अगदीं कुचकामाचं असं तूं ठरवून टाकळंच पाह्यजेस. पहातों, कसा काय

हा अधिकार बजावतोस तो. बरोबर साह्याला आणखी आपल्या दंडालाहि घेऊन जा. हें पहा गरज पडल्यास तुझ्या सर्व कृत्यांची संपादणी करायला आम्ही इथं खबरदार आहोंतच. जा.

(उन्माद जातो.)

—चला, आतां राजसत्तेच्या महालाकडे जाऊं. अलीकडे तो विचारस्वातंत्र्याचा मुलगा लोकमत आल्यापासून मजबद्दलच्या तिच्या वर्तनांत पुष्कळ फरक पडलेला दिसतो. पूर्वीसारखा ती माझा सत्कारहि करीत नाहीं. सदां त्या दोघांचंच हितगुज चाललेलं असतं. (पाहून)—हें पहा, आज तो परत आर्यमंडल देशाला जाणार म्हणून त्याच्या गौरवासाठीं काय हा महाल शृंगारला आहे तिनं! हीं पहा. तींच तीं दोघंजण महालाच्या पायऱ्यांवरनं खालीं नजरबागेंत उतरताहेत. काय? एकमेकांच्या अगदीं गळ्यांत हात? आं? चुंबनहि घेताहेत? (त्वेषानें) अरे भिकारड्या लोकमता? महाराणीच्या गुरुबंधूचा तूं मुलगा असलास तरी तूं त्या जिंकलेल्या, कंगाल, रानटी आर्यमंडल देशांतला एक यःकश्चित सामान्य

मनुष्य आहेस, हें विसरलास काय ? येथल्या राजदरबारशीं आज प्रत्यक्ष माझा संबंध राहिला नसला, तरी एक वेळ इथं राज्यैश्वर्य भोगलेल्या थोर कुळांतील जो मी राजकुमार, एकतंत्र त्या माझा भाग तूं पटकावणार ? काय हें धारिष्ट ! केवढं तुझं साहस ? अरे–

(झंपा.)

श्वेताख्य ही नगरि वैभवयुक्त कोठें ॥ तें आर्यमंडल तुझें जितराष्ट्र कोठें ॥ वंशानुवंशग नृपत्व मदीय कोठें ॥ तूं ग्राम्य लोकमत अश्रूतपूर्व कोठें ॥

–थांब; वरिष्ठ पायरीला असा पाय लावतो आहेस या तुझ्या पातकाचं तुला योग्य प्रायश्चित्त आतां तिकडे गेल्यावर चांगलं मिळेल, अशीच तजवीज करून ठेवतों.

(श्लोक.)

महतिस मम मोठें विघ्न हें जाणुनीयां ॥ धुमसत बहु होता वैर वन्ही मनीं या ॥ बघुनि परि अतां हा सावमान प्रकार ॥ प्रखर करि तयाला ही पहा तैलधार ॥

—बस्स, मला राजपुरुषाला सोडून या यःकश्चित् सामान्य मनुष्यावर भाळणाऱ्या राजसत्तेची मी आतां यावेळीं भेटच घेत नाहीं. आधीं तिचा असा प्यार होऊं पाहणाऱ्या या लोकमताला लंबे करण्याची तयारी करीन, आणि मग ती माझ्या प्रेमार्पणाचा कसा निषध करील तें पाहीन——

(चाल—अंजनपर्वा न करी.)

द्वेषाग्नित आहुती अगोदर लोकमताची मी देतों ॥ एकतंत्र मग सोडुनी सत्ता जातें कोठें तें बघतों ॥ विचार स्वातंत्र्याचें सगळें कुळचि धुळीला मिळीवतों ॥ प्राप्त नवा अधिकार पहातो कसा निग्रहें बजावतों ॥

(त्वेषानें निघून जातो.)

प्रवेश पांचवा.

(स्थळ, महाल—बागेचा देखावा. लोकमतें व राजसत्ता महालाचे पायऱ्यांवरून बागेंत उतरताहेत. बरोबर दासी आहेत.)

राजसत्ता-(एकेक उपचार अर्पण करीत)

(चाल-साधी.

कंठीं अर्पितसे मी हार ॥ गुंफियला सुमनांचा ॥ कं० ॥ देत्यें तांबुलही मुखरुचिर ॥ दर्शक मत्प्रेमाचा ॥ दे० ॥ करितिल उटणीं हीं परिहार ॥ मार्गांतिल श्रमाचा क० ॥ प्रभुला प्रार्थिन मी बहुवार ॥ प्रवास होउं सुखाचा प्रभु० ॥

लोकमत-(विनयानें)—

(चाल-बांधिल्या नव घं०)

आदरा मुळि पात्र मी नच मान हा मजला पुरे ॥ होति कीं उपकारसे उपचार जे असुनी खरे ॥ स्नेह तरि जो समानांतचि होय तोचि बरा दिसे ॥ भाग्य तव तें थोर किति तरि तुल्य मी मुळि त्या नसे ॥ आदरा० ॥

राजस०-माझ्या भाग्याची नको मेली स्तुति. हेंच पहाना, आपल्याला राहून घेईन असं माझं भाग्य

आहे का कांहीं ? तसं असतं, तर मी जाऊंच दिलं नसतं.

लोकमत—तरी पण त्यानं आपला प्रभाव दाखवा-याला कांहीं कमी केलं नाहीं.

राजसत्ता—तो काय बरं ?

लोकमत—माझं मन ठेवलंयच ना आडकावून ?

राजस०—तें तसं राह्यलं मागं तर !

लोकमत—पण त्याजवर माझी आतां सत्ताच उरली नाहीं—

(दिंडी.)

प्रीतिपाशें दृढबद्ध जाहलें तें ॥ सुटुनि त्यांतुनि मजसवें काय येतें ॥ देह तिकडे मन इथें या स्थितीचा ॥ कोंवि न कळे परि-णाम होउ साचा ॥

—खरंच सांगतों, आपला परिचयच झाला नसता, किंवा पुढची कांहीं निराळीच आशा दाखविण्यासा-रखा असा तो महाराणींनीं इतका वाढूंहि दिला नसता, तर फार बरं झालं असतं. आतां दोघांची स्थिति आपापल्या ठिकाणीं उगाच बावरल्यासारखी राहील.

राजसत्ता–" उगाच " काय म्हणून ?

लोकमत–उगाच नव्हे तर काय वरं? असं पहा—

(चाल–कहांके पथकर०)

आशास्थल आहे कां कांहिं तरि हिला तसें ॥ आ० ॥ विषम गोष्टि असति किती ॥ नाहीं विघ्नांहि मिती ॥ हेतुसिद्धि मज अगदीं ॥ असंभाव्यशी दिसे ॥ आशा० ॥

–आतां नाहीं म्हणायला एक आपलाच निश्चय !

राजसत्ता–आन् तोच तर मी म्हणत्यें कीं आपल्या हेतुसिद्धीची नुसती आशा दाखवण्यासारखाच नव्हे तर खातरीदाखलहि आहे. मी तरी आपला निर्धार स्पष्ट सांगून ठेवत्यें,—

(चाल–बैतुल सलमको छो०)

जडलें स्थलीं या प्रेम तें दृढ तेथ राहिल ॥ पडलें मना तरि तें सुखें आयास साहिल ॥ निग्रहें हा देह हें आयुष्य वाहिल ॥ जरि हेतु सिद्धि न येथ ती परलोकिं होइल ॥

लोकमत–अहाहा ! खरोखर मी धन्य आहें ! आजच्या माझ्या स्थितीला जरी मीहि असाच कांहीं

आपला निश्चय सांगणं साहस होईल, तरी या तुझ्या निर्धाराचा आदर मला कांहीं केलाच पाहिजे म्हणून सांगतों—

(चाल—खासेमहाल विशा०)

गुणेंचि हा मम उणेपणा मी पूर्णपणें आधीं भरितों ॥ समंत्रिमंडळ महाराज्ञितें प्रसन्न करुनी तुज वरितों ॥ प्रयत्न माझा पुण्य तुझेंवरि कृपा जरी भगवंताची ॥ एक जाहल्यावर मग सरली समज काळजी चित्ताची ॥

—बरं पण आतां मला जायला आज्ञा पाह्यजे. आमची निघण्याची सर्व तयारी झाली आहे.

राजसत्ता—पण अशीं चार पावलं पोंचवायला बराबर आल्यें तर काय होईल ?

(चाल—वस्त्रानें देह०)

येत्यें मी पोंचवाया चार अशीं पावलें। प्रस्थान प्रसंगाचें शेवट हें राहिलें ॥ ह्मणतां जें येथ मागें मन अपुलें ठेविलें। तेंच समाधान आहे आतां मी मानिलें ॥

लोकमत-नको. हें आपलें प्रेम तूर्त आपल्यांतच असूं द्यावें, इतक्यांत तें कोणाच्या दृष्टीं न पडेल तर बरं, हें बघ—

(चाल-स्फटिकाचे हे पद०)

अवचित या अपुल्या संगतिला ॥ हा प्रेमांकुर नविनचि फुटला ॥ बाल अजुनि तो ह्मणुनी त्याला ॥ फार पाहिजे जपुनि ठेविला ॥ दृष्टि कुणाची ना तरि याला ॥ पडतां कारण ती बाधेला ॥

राजसत्ता-पण मी आपल्या बागेच्या या दरवाजापर्यंत तरी आपल्याला पोंचवायला येणारच गडे ?

लोकमत-मर्जी तुझी !—

(चाल-गझल.)

प्रीतियोग हा वियोगरूप धरितसे ॥ उल्हसिता आज मना खिन्न बहू करितसे ॥ प्रीति० ॥

(जातात—पडदा पडतो.)

अंक दुसरा.

(स्थळ, आर्यमंडल—एका बाजूनें उत्पात व दुसऱ्या बाजूनें उन्माद आपापल्या लष्करांसह येऊन पुढील पद्यांतलीं आपापलीं चरणें ह्मणत फिरतात.)

उत्पात—

(चाल—ब्यांडची.)

वंदु देविदुर्गती ॥............

उन्माद—

.........स्वस्ति विजययिनी प्रती ॥

उत्पात—

यश तुझ्या कृपेमुळें ॥............

उन्माद—

.........पुण्य तव अह्मा फळे ॥

उत्पात—

त्वत्पदांघ्रि चुंबक ॥............

उन्माद—

.........॥ आह्मि राज्ञिसेवक ॥

उत्पात—

कार्य आपुलें करूं ॥

उन्माद—

.........॥ हुकुम सक्त वापरूं ॥

(फिरतां फिरतां समोरासमोर येऊन थांबतात)

उन्माद—उभा रहा; कोण तूं ?

उत्पात-थांब; आधीं तूंच सांग, कोण आहेस तो?

उन्माद-मी महाराणी विजयिनीचा कांहीं एक विशेष अधिकारनियुक्त सेवक आहे.

उत्पात-मी देवी दुर्गतीचा जनपद विध्वंसक असा एक कार्य वादक आहे.

उन्माद—म्हणजे उत्पात तूं !

उत्पात-होय आणि तुझं नांव ?

उन्माद-मला उन्माद म्हणतात.

उत्पात-बः, नांव तर खूप जोरदार दिसतंय.

उन्माद-असाच माझा पराक्रमहि तुला दिसेल.

उत्पात-तूं मला माझ्या कार्यांत प्रतिबंध करणार?

उन्माद-इतकंच नव्हे, तर या आर्यमंडलाकडे पुनः तुम्ही पाहणार नाहीं अशी तुमची पक्की खोड

मोडणार ! आज ही प्रत्यक्ष गांठ पडली हें फार उत्तम झालं.

उत्पात—अरे, आमची खोड मोडणं तर असोच, पण असल्या भलत्याच साहसानं तुला मात्र आपला प्राण सोडण्याची वेळ येऊं नये म्हंजे झालं. उत्पाताचा प्रतिकार ही कांहीं उगाच घमेंडीची गोष्टच नाहीं. जगांत वेळोवेळीं वाटणाऱ्या अनाचारी अत्याचारी मनुष्यांचा एकदम मोठा निःपात उत्पाताच्याच हातानें झाला पाहिजे. अदृष्ट योजना असतेही. तिच्या प्रेरणेनं आम्ही यावं आणि आमचं कार्य होतांच आम्ही जावं असाच सृष्टिक्रम आहे. या वांचून उत्पाताला प्रतिबंध करायला या जगांत कोण समर्थ आहे? अविचारानं जे आमच्या संचाराला आड येतात, ते आपल्या हालविपत्तींत मात्र अधिक भर घालून, अनेक प्रकारच्या मनस्वी हानीस पात्र होतात. या साठीं सांगतों, कीं, खबरदार प्रत्यक्ष आमच्या वाटेस जाल तर——

(चाल—नृमांसखंडशोणि०)

हटा सरा कराच मार्ग आमुचा खुला ॥
आडवाल तरि मुकाल जीव आपुला ॥ जे

कुमार्गं कर्दमीं खुशाल लोळती ॥ दावुं त्यां मरां कराल देवि दुर्गती ॥ निष्प्रतिबंधें येथ फिरूं ॥ पापी दुर्जन संहारूं ॥ चला निघा मागें एका बाजूला ॥ हटा० ॥

(उत्पात आपल्या लोकांसह निघून जातो,)

उन्माद—अः, अशा हटावणीनं या जगांतलीं म्हातारीं कोतारीं, किंवा अशक्त भ्याड, अथवा मूर्ख अजागळ माणसं मात्र भिऊन नाउमेद होतील आणि प्रयत्न सोडून निमूटपणें या उत्पाताला बळी पडतील ! पण प्रयत्न हें ज्याचं शस्त्र आणि स्वतंत्र सत्ता ही ज्यांची शक्ति असे आम्हीं या राक्षसाला त्याच्या त्या एकेक अनर्थ परंपरेसह खुशाल अप्रतिबंध या ठिकाणीं संचार करूं देऊं काय ? जगांत मनुष्याचे जीवाचा आधार प्रयत्न हाच आहे. तो सुटणं म्हंजे त्याचे मूळच तुटण्यासारखं होय. मग हीं भोंवतालचीं एकेक जबरदस्त तत्वं त्याला पदोपदीं मारक होऊन त्याचं जीवनच अशक्य करून ठेवल्यावांचून कधींही राहणार नाहींत. तेव्हां अशा निराधार स्थितींत या

लोकांना सोडून, उत्पाताला त्यांजवर खुशाल आपले अनर्थ माजविण्याला मोकळिक देऊं, अशी कल्पनाच नको आहे. पहातों कुठें जातोय तो, आमच्या तडा-क्यांतून—

(चाल–टूस्टी भाग्नी सर्दार)

स्वतंत्राधिकार ॥ आणि अति हुषार ॥ यत्नाविमुख कधि न राहणार ॥ प्रसंग दुर्निवार ॥ ह्मणुनि काय हार ॥ घेऊं होऊं कीर्तितरु कुठार ॥

(आपल्या लोकांसह निघून जातो.)

प्रवेश दुसरा.

(पात्रें, असंतोष उड्या मारीत येतो. मागून विक्षोभ येतो.

असंतोष–(आनंदानें) ओ हो हो ! युक्ति पण युक्ति; अति नामी युक्ति !

विक्षोभ–प्रत्यक्ष असंतोषच ज्यापेक्षां इतका संतोषला आहे, तेव्हां दिसतेय खरी कांहीं अपूर्व युक्ति!

असंतो०–अरे अपूर्व म्हंजे काय विचारतोस ? हें बघ, श्वेतपुरीहून या देशांतल्या उत्पाताच्या बंदोबस्ता करतां मोठ्या डौलानं आलेल्या त्या सरदाराचा आपण आतां जाऊन एकदम खून करणार !

विक्षोभ–काय ? खून ? आणि तोरे का ? मी तर म्हणतों कीं बरं चाललंय हें परस्पर ! त्यानं आडदांडपणानं उडवलेल्या या विचित्रच धामधुमींत विचारस्वातंत्र्याचं आयतं कांडात निघतंय तें काय वाईट ? घे म्हणाव, राणी विजयिनीच्या त्या महोत्सवाचं फळ ! काय बेट्यानं हुरळून लोक नादीं लावले होते पहा. त्याला वाटलं कीं आतां देवी महाराणी आपण दाखवलेल्या या भलोट भक्तींनं सुप्रसन्न होऊन या आर्यमंडलाचा कुळ कारभार एकदम आपल्या हातीं सोंपवणार ! पण आतां हें खासं अंजन बसतं आहे त्याला. हल्लींची ही उन्माद-रावांची स्वारी खूपच खमंग भेटली खरी. स्वतः कळेना, कोणास वळेना असा पक्का दंडेलच दिसतोय तो. उत्पाताचा बंदोबस्त राहिलाच कोणीकडे, पण लोकांनाच, भीक नको कुतरा आवर, अशी स्थिति

करून त्यामुळं अनायासानं पुढें येण्याचा विचार-स्वातंत्र्याला सुरेख छळायला आरंभ केलाय त्यानं या वेळीं त्याचा तो महाराणीनं दिलेला लोक प्रतिनिधित्वाचा अधिकार चटसारा या राजश्रींनीं गुंडाळून ठेवला आहे! तेव्हां असा बिनपैशानं या खुळ्या लोकांचा चांगला तमाशा पाहण्याची सोन्यासारखी संधी आली असतां त्या उन्मादाच्याच जिवावर उठण्याची कल्पना कां तुला आली? त्यांत काय साधणार?

असंतोष—अरे बाबा, त्यांतच तर विशेष आहे यावेळीं. विचारस्वातंत्र्याच्या आतां पर्यंतच्या एकंदर उत्कर्षाला बारंवार भर घालणारा मूळ झराच विष कालवून पार दूषित करून ठेवतां येणार आहे यानं. कसा म्हणून नाहीं विचारलंस?

विक्षोभ—हां, कसा?

असंतोष—बरं पण मला आधीं असं सांगा कीं, नेहमींच्या पद्धती प्रमाणं या उन्मादानं यावेळीं विचारस्वातंत्र्याचं साह्य घेण्या ऐवजीं विशेषेंकरून त्याच्याच जो तो इतका राशीस लागलेला दिसतोय, त्याला,

या विचारस्वातंत्र्यानं त्याचं काय असं घोडं मारलं असावं, याबद्दल तुझा कांहीं तर्क चालतो ?

विक्षोभ–नाहीं बोवा.

असंतोष–मुद्रणकलेचा संबंध, गुरुबंधुत्वाचं नातं. लोकप्रतिनिधित्वाचा अधिकार वगैरे खाजगी व लौकिक अनेक कारणामुळं महाराणीनं तरी त्याला उत्पात सोडून अशा विचारस्वातंत्र्यावरच अंमल गाजविण्याचा हुकूम दिला नसेल हें खचित !

विक्षोभ–मग हें काय असावं बरं ?

असंतोष–मी एक अटकळ बांधली आहे. आन् तीच खरी असली पाहिजे. मी म्हणतों कीं, याविचारस्वातंत्र्याचं हें इकडे वाढत असलेलं महात्म्य न चाहणारी कांहीं मंडळी श्वेतपुरीकडे असलीच पाहिजे. आन् हे उन्मादराजेश्री त्याच पुढ्यांतले दिसतात. यांना आपण इकडे असें लंबे केलें कीं, तिकडल्या यांच्या मंडळीला विचारस्वातंत्र्यावर आपला द्वेष उगवून घ्यायला हें निमित्त आपण फार छानदार करून दिलेंसं होईल. झालं. आपलंहि परभारें बिनतोड काम साधेल !

विक्षोभ–पण हा द्राविडी प्राणायाम होतोय.

असंतोष–केलाच पाहिजेय तो. त्या खेरीज का नुसत्या या उन्मादाच्या इकडल्याइकडे चालणाऱ्या चेष्टांनीं, किंवा तुमच्या आमच्या तोंड लपवून चालणाऱ्या अशा गुप्तमसलतींनीं, आपला बेत आहे त्या प्रमाणं, विचारस्वातंत्र्याचा पुरता सूड उगवायला आपल्याला सांपडणार आहे ?

विक्षोभ–मग तर हा खून फारच गुप्तपणानें झाला पाहिजे.

असंतोष–त्याची नको तुला काळजी. तूं आतां जाऊन त्या रक्तपाताला इकडे पाठवून दे म्हंजे झालं.

विक्षोभ–बराहे. तें काम माझं. (जातो.)

असंतो०–आतां ती राजनिष्ठा पोर ! मोठ्या पायगुणाची ऐकत होतों तें अगदीं खरं. पहा या विचारस्वातंत्र्याच्या घरनं ती नाहींशी होतांच त्याला प्रतिकूल काल येत चालला; अन् आमच्या राजद्रोह नायकांच्या हातीं ती पडल्यापासनं त्यांचे हेतु सिद्धीस जाण्यासारख्या एकेक त्यांना अनुकूल गोष्टी चहूंकडून जमूं लागल्या. खरोखर, असलं रत्न एकदां आपल्या-

ला लाभल्यावर मी दिखील किती तरी भाग्यवान् होईन ! पण काय करावं; अजून कांहीं ती वळत नाहीं. तिचा बळि देण्याचा विधि नायकाकडनं मी युक्तीनं लांबणिवर टाकून तुरुंगामध्यें त्यांच्या न कळत कधीं तिचे हाल तर कधीं उत्तम बडदास्त, असा प्रकार चालीवला आहे. तिला मोठमोठ्या अशा दाखवतों, भीति घालतों, दीन होऊन पायांसुद्धां कि हो पडतों, पण व्यर्थ; आतां कुठं तरी अशाच कांहीं बतावणींत दूर जंगलांत नेऊन बलात्कार करावा, त्यावांचून तोड नाहीं, बराहे, इकडच्या या कामगिरींतनं सुटलों कीं तोच विचार. (जातो.)

प्रवेश तिसरा.

(पात्रें–विचारस्वातंत्र्याकडे लोक गाऱ्हाणीं सांग॰ण्यास आले आहेत.)

विचार—

(चाल–देखो सखी कन्है॰)

नका नका करूं असा मुळिं अविचार ॥

रहा ठेवुनियां सर्व प्रभुवरी भार ॥ नका०॥ दीन जनावनिं कुजन विनाशनिं ही ॥ नकरी उपेक्षा तो जगदाधार ॥ न० ॥

एकजण—मग याच वेळीं त्याप्रभूची डोळेझांक कशी होतंय हो म्हणावी ?

दुसरा—आपलीच कांहीं नष्टचर्या जाणावी.

तिसरा—मी ह्मणतों आतां आमच्या विचारस्वातंत्र्य महाराजांनीं तरी याला एखादी तोड मनांत आणावी.

चवथा—कीं जिच्या योगानं ही चहूंकडून विनाकारण हाल विपत्ति समूळ खणावी.

विचार०—(आपल्याशीं)

(दिंडी.)

प्रेम भारी मजवरीं या जनांचें ॥ तसें आधारस्थल हि मीच यांचें ॥ काय सांगूं प्रिय यांस तरी आतां ॥ धीर देउनि यांचिया व्यग्र चित्ता ॥

एकजण—हा काय उत्पाताचा बंदोबस्त झाला ?

दुसरा–लोकांचाचें जबरदस्त भोग आला.

तिसरा–दुनियेंतला सारा न्यायच कायहो मेला!

चवथा–निदान कुठें तरी खचित उठून गेला!

विचार०–(आपल्याशीं)—

(चाल—मारदियोरे पपि०)

दुर्दशा अशी जगांत दुर्दशा० ॥ न पहावे न ऐकवेहि सोशितिल कशी॥ काष्ठ तें जसें प्रदीप्त काष्ठ तें जसें ॥ दोहिंकडुनि लोक दिसति पीडिलें तसे ॥

एकजण–प्रत्यक्ष उत्पातांना कि नाहीं लोक इतकें डरत नाहींत.

दुसरा–पण त्या मिषानं उगाच चाललेल्या या दंडेलपणापुढं कुणीच ठरत नाहीं.

तिसरा–लोकांनाच अशा असह्य पीडा देऊन त्यांचं कुणी कल्याण साधल्याचं कधीं स्मरत नाहीं.

चवथा–पण हें त्या उन्माद राजेश्रींच्या डोक्यांत कसं शिरत नाहीं.

विचार०-(आपल्याशीं)—लोकांच्या कुरकुरी बद्दल पुष्कळवेळां अधिकारी त्याच प्रमाणें समाजांतील विचारी लोक असं म्हणत असतात, कीं—

(साकी)

असत्या स्थितिहुनि जरा वेगळा प्रकार दृष्टिस पडतां ॥ रूढ स्थिति पालन स्वभावें त्याविषयीं अप्रियता ॥ निपजे लोकमनीं ॥ प्रकटे तीच विलापांनीं ॥

—अथवा असंहि एक होत असतं—

अज्ञपणाच्या असत्कल्पनांनीं जन होति अशांत ॥ म्हणुनि करिति दुर्लक्ष्यचि तिकडे त्यांत सुज्ञ जे शांत ॥ परि या शंकांतें ॥ कारण नच या समयातें ॥

—यांच्या दुर्दशेची कल्पना कशाला? सर्व कुटुंबां-तील माणसांसुद्धां मलाच त्याचा प्रत्यक्ष अनुभव आहे. बिचारा लोकमत, महाराणी विजयिनीकडून केवढ्या उमेदीनं आला; पण इकडे आल्यापासनं

एकसारखी ही दुःखपरंपराच त्याच्याहि पाठीस लागली आहे.

एकजण—मग कसं काय महाराज, कांहीं निघतेय का याला तोड ?

दुसरा—कां आतां आम्हीच जाऊन जिरवूं त्या उन्मादाची पुरी खोड ?

तिसरा—दिसतंय हेंच सर्वांत गोड !

चवथा—आन् यानंच चुकेल त्याच्यापुढं जाऊन तीन तीनदां करायची उरस्फोड !

विचारस्वा०—

(चाल—छे छे हे प्रभाव०)

छे छे अविचार हा कधिं नसे बरा ॥
शांत चित्त ठेवुनियां धैर्य मनिं धरा ॥ छे० ॥
कठिण हे प्रसंग गोष्ट निर्विवाद ही ॥
तच्छामक कठिणसेच जरि उपाय ही ॥
योजनेंत त्यांच्या ती सुजनता हवी ॥ तरि
सहिष्णुताहि तुम्हीं दाखवा जरा ॥ छे० ॥

—शिवाय— (साकी)

ठरवुनियां जे आत्मविघातक देशपार करवीले ॥ मूर्तिमंत कुविचार तयांना होइल कीं शिरुं दिधलें ॥ निज अंतर्यामीं ॥ वदतां दुर्वच हे आह्मी ॥

—बरं, चला, मी आणखी एकवेळ त्या उन्मादाकडे जाऊन तुमच्या त्रास हरकती पुनः त्याला नीट समजावून सांगतो. लोकमताला मघां धाडलाच आहे त्याच्याकडे.

एकजण—ईश्वर ह्यावेळीं तरी तुम्हाला यश देवो !

दुसरा—आन् आमचे हे उगाच हाल वनवास लयाला नेवो.

तिसरा—त्या अधिकाऱ्यांला आमची कांहीं तरी दया माया येवो.

चवथा—निदान या उत्पाताचा बंदोबस्त आमचा आम्हाला पाहण्याची तरी तो मोकळिक ठेवो !

विचार०—करतों, अशा प्रकारचीच कांहीं रद-बदली त्याचेकडे जाऊन करतों. तुम्ही स्वस्थ असा, तरी पण तुम्हाला एवढं सांगून ठेवतों कीं—

(चाल—नमुनि जननी०)

असूं द्या कीं सदा ध्यानांत ॥ हे सगळे उत्पात ॥ ईश क्षोभानें कुजनांच्या शासनार्थ येतात ॥ असूं० ॥ यास तरी खरे उपाय दोनच, पहिला ईशकृपा ॥ दुसरा आपण सदा असावें पवित्र आचरणांत ॥ असूं० ॥

(जातात.)

—तसेंच हेंहि पण ध्यानांत ठेवा कीं—

(चाल—प्राप्त होय जें निधान.)

जेव्हां कांहीं प्रसंग ऐसे देशावरि येती ॥ चिन्हचि तें समजा कीं आहे महत्फलप्राप्ती ॥ तप्त जाहल्यावर छायेचें सौख्य खरें भासे ॥ क्षुत्पीडा जरि तीव्र, अन्न तें रुचि बहु देत असे ॥ गांजी आपत्प्रसंग तरि तें संपत्फल सुखसे ॥ जाणुनि ऐशा समयिं ठेवणें समाधान चित्तीं ॥ जेव्हां० ॥

प्रवेश चवथा.

(स्थळ, उन्मादाची कचेरी-पात्रें, उन्माद व लोकमत.)

उन्माद-(दरडावून)-हंः, दूर उभा रहा. आन् काय तुला सांगायचं असेल तें थोडक्यांत आणि लौकर सांग. राणी विजयिनीच्या विशेष लोभाचा डौल माझ्यापुढें चालणार नाहीं, समजलास !

लोकमत (विनयानें)-महाराज, आपण म्हणाल तिथं उभा रहातों, आन् सांगाल तशा भाषेंत बोलतों. हें पहा—

(साकी.)

तुह्मि जसे अधिकारसूत्रधर आज्ञापर आह्मी हे ॥ चाळवाल त्यापरि आह्माला मार्ग वागणें आहे ॥

उन्माद-पण तुला हा शास्त्रार्थ कुणी विचारला ? आम्हाला तो ऐकत बसायला वेळ नाहीं.

लोकमत-मीहि तो सांगायला आलोंच नाहीं. उत्पाताच्या बंदोबस्ताची म्हणून आपण जी एखादवेळ

शिस्त आरंभतां ती लोकांसच कशी अधिक पीडाकर होते हें आपणास लोकांच्या तर्फे मला कळवावयाचें आहे.

उन्माद—मग तेंच तर सांग काय तें. हा उगीच पाल्हाळ नको !

लोकमत—थोडक्यांतच सांगतों. आपल्या पद्धती संबंधानें लोकांचे उद्गार असे ऐकूं येत आहेत—

(चाल—वदनचंद्र तव अ०)

जरी सदिच्छा प्रेरित तुमचे उपाय उत्पातावर्ती ॥ जनस्थितिस अनुरूप न ह्मणुनी अपायसमची कधि होती ॥ रोगाधिक जणुं भोगचि व्हावे तैसें पीडा हे देती ॥ किंवा नेत्रीं दुःख असुनियां कानिं फुंकिल्यापरि होती ॥ वित्त जीविता वरील तर ते सात्वाचि कोणा नुरवीती ॥ जिणें कायपरि मरणेंही नच सुलभ असे ते ठेवीती ॥ कर्तुमकर्तु समर्थत्व तर सामान्य व्यक्तिस देती ॥

न्याय नीतिचें छत्रसुखाचें नुरलें ऐसें भासविती ॥ प्रजा प्रेमही महाराज्ञिचें—॥

उन्माद्–(मध्येंच)—बस्स. पुरें कर. समजलों. हें लोकांचें म्हणणें काय ? असले विचार या लोकांच्या कधीं तरी मनांत येतील ?

लोकमत–कां नाहीं येणार ? लोकसमाज काय इतका जडमूढ असतो ?

(चाल—काय मला भूल०)

तीव्र असति त्याला सुख दुःख भावना ॥ कालवशात् उठति सुष्ट दुष्ट कल्पना ॥ नाहिं उणी त्यास तशी प्रखर चेतना ॥ अति विस्तृत ह्मणुनि दिसे त्यांत जडपणा ॥

उन्माद्–होय. आणि लोकसमाजाच्या या जडविस्तृतपणामुळेंच प्रसंगविशेषीं त्याच्याशीं आम्हाला मोठ्या खबरदारीनं आणि केव्हां केव्हां विशेष सक्तीनं हि वागावं लागतं. नाहीं पेक्षां एकीकडे समाजाचं हें अवजड ओझं संभाळून वारंवार अरिष्टाशीं आह्माला निश्चयानं मुळींच झुंजतां येणार नाहीं.

लोकमत-पण या समाजाचं असं ओझं वाटण्या सारखी भीति नकोच आहे मुळीं. महाराणी विजयि-नीनं घालून ठेवलेल्या उदार पद्धतीप्रमाणं समाजाशीं अधिकाऱ्यांचं सरळ व प्रेमळ वर्तन राहिलं, तर कारण प्रसंगीं समाजाकडून त्यांना उलट साह्यच होणार आहे. अहो—

(**चाल**–जनसारे मजला.)

कर काय शरीरा जड झाले ॥ कर० ॥
भार न भूपा प्रजे मुळें ॥ कर० ॥ योग्य प्र-
जागुण गौरव करुनी ॥ राजकार्यि तिजला
विश्वासुनि ॥ कर्तव्यीं या प्रकृति रंजनीं ॥
सत्ताधीश न ते जरि चुकले ॥ कर काय० ॥

उन्माद–तर मग आम्हीच आपल्या पद्धतींत चुकतों आहों असं दर्शविण्याचा तुझा भाव, नव्हे का ? अथवा बरोबर आहे. राजशासना विरुद्ध लोकांच्या मनांत नसतें भय व शंका उत्पन्न करून त्यांना क्षोभविणारे कोण हें माहीत असतां, अगर प्रत्यक्ष समोरच असतां, आम्ही यावेळीं तरी आधीं

त्यांचा बंदोबस्त करीत नाहीं, ही आमची चूकच खरी. ठीक आहे. आतांच तिची दुरुस्ती करूं म्हंजे झालं. कोण आहे रे? (शिपाई येतात.) बांधा याच्या मुसक्या. आन् ठेवा तूर्त असाच तिकडे नेऊन चौकीवर अटकावून !

(शिपाई लोकमतास धरतात.)

लोकमत—वाहवारे न्याय !—

(चाल—सुरपुरिचें कार्य पहा०)

नसतां अपराध मुळिंच बंधन मज होत असे ॥ नयनीं तिहि जाय काय गेले ते सुदिन जसे ॥ जनहितपरतेस काय बक्षिस ऐसेंच असे ॥ मानहानि होउनि वरि सोसावे छ-ळहि तसे ॥ लोकमनीं ह्या कृतिनीं उठतिल वाईट ठसे ॥ जे मदांध त्यांस काय याचा परिणाम दिसे ॥

(शिपाई लोकमताला नेतात—दुसऱ्याबाजूनें विचारस्वातंत्र्य येतो.)

विचार—हा कोण ? माझा मुलगा, लोकमत ?

उन्माद्–होय. (एकीकडे) यांनाहि त्याच्याच सोबतिला पाठिवलं पाहिजे.

विचार०—पण त्याची अशी स्थिति होण्याचं कारण ?

उन्माद्–(आपल्याशीं) कारण ? आमची मर्जी आन् तुमचं दुर्दैव ?

विचार०–दुर्दैव असलं तर तें भोगलंच पाह्यजे. पण मर्जी असली—

उन्माद्–तरी तीहि ऐकलीच पाह्यजे.

विचार०—अधिकाऱ्यांच्या निवळ मर्जीनंच अमल बजावले जाऊं लागले तर मग बोलणंच खुंटलं.

उन्माद्–तेंच आम्हाला पाह्यजे आहे (एकीकडे) अथवा तसं कशाला ? यांचाहि बंदोबस्त आतांच करून टाकूं या. (जातो .)

विचार०–(आपल्याशीं)—अथवा यांत कांहीं नवल नाहीं. हें असंच व्हायचं. कारण—

(चाल—वीरा भ्रमरा जन्मु०)

मूर्तिमंत उन्माद त्यांत अनियंत्रित सत्ता करीं ॥ असलिया गति कैशी मग बरी ॥

घातक असतें शस्त्र जसें तें शास्त्रहि तैशा-परी ॥ विचारी जनाचि जपुनि वापरी ॥ मि-ळतां तें अधिकारदुर्मदा प्रमत्ताचिया करीं ॥ दुर्दशा सहजचि तो मग करी ॥

—(पाहून)—अरे पण हें काय इकडे ? ही कोण? आमची ताई, राष्ट्रजाग्रती ? आन् तिच्याहि मागं शिपाई ? तें कां बरं ?

(आत्याबाईला घेऊन शिपाई येतात.)

विचार०—(पुढें होऊन)—अरे थांवा थांबा. तिच्याशीं अशी दांडगाई करूं नका. ती ह्मातारी आहे.

शिपाई—हां खबरदार, आमच्या कामांत आम्हाला आडवाल तर.

विचार०—मी तुम्हाला आडवीत नाहीं. पण ती माझी बहीण आहे.

आत्याबा०—बघरे भाऊराया, माझे कसे या मे-ल्यांनीं हाल मांडले आहेत ते !

शिपाई—कोण ? विचारस्वातंत्र्य का तुम्ही ?

आत्याबा०—होय हो. माझाच भाऊ तो. किती शहाणा, काय लोकांची कळकळ त्याला, आपल्या दोघी

गोरी गेल्याचं दुःख बाजूला ठेवून सध्यां या चहूंकडनं गांजल्या पीडल्या लोकांच्या उपयोगी पडण्यासाठीं काय ग बाई जीवापाड परिश्रम चालले आहेत त्याचे.

शिपाई–(दूसऱ्या शिपायास)—मग यांनाहि पकडारे. चला घेऊन बरोबर.

(शिपाई विचारस्वातंत्र्याला धरतात.)

विचार०–अरे हें काय ? मला तुह्मी कां पकडतां ? माझा अन्याय ?

शिपाई–आम्हाला तें कांहीं माहीत नाहीं. आह्मी हुकमाचे चाकर. उन्मादरावांनीं आह्माला सांगितलं आहे कीं, विचारस्वातंत्र्याचीं माणसं तुम्हाला जिथं जिथं म्हणून फिरतांना आढळतील, तिथंच त्या साऱ्यांना एकदम पकडून चौकीवर अटकेंत ठेवा.

विचार०–पण हा हुकूम तर म्हणतां माझ्या माणसांना पकडायचा आहे, होय ना ?

शिपाई–मग ? तुह्मी काय तुमच्या माणसांवेगळे आहांत, होय ? वा राव, या कायद्याच्या गोष्टी सांगून आमच्याशीं हुजत घेऊं नका. चला पुढें, ते पहा

आमचे नाईक आले. त्यांनीं पण आणखी कुणालासं धरून आणलंच आहे.

(नाईक मुद्रणकलेला घेऊन येतात.)

विचार०–अरे ही माझी प्रिया !

मुद्रण०–कोण ? प्राणनाथ ?

(गाहिंवरून भेटतात.)

मुद्रण०—प्राणनाथ,—

(चाल—दिलदारी के तिरे०)

अनुभवतों दुर्दशा ॥ सांगा कांहीं ॥अनु०॥ परुष वचन किति वदुनि विटंबिति ॥ निर-पराध आह्माप्रति ॥ अनु० ॥ धर्म करीतां कर्म उभें तें ॥ ह्मणति तसें प्रत्ययास येतें ॥ कां ही दुर्दशा० ॥

विचार०–प्रिये,—

(चाल—राजाहूं मैं कोमका०)

जनसेवा व्रत आपुलें चालवितांनाहीं ॥ प्रायश्चित्तें मधें मधें अशि लागतिं घ्यावीं ॥ निंदा छल अवहेलना हानि स्वार्थाची ॥ कष्ट परोपरि कर्मोगेंहीं या व्रतविधिचीं ॥ नगणीं

तूं विपरित हें खेद नको मानूं ॥ लोकस्थिति चिंतनीं असा व्यत्ययगे आणूं ॥

आत्याबा०—अरे बा, आपल्या संकटांतहि तुला लोकहिताचीच काळजी आठवते ना. धन्य बा तुझ्या उदारतेची !

विचार०—अग ताई—

(श्लोक. कालंगडा.)

जनहित करितांना भूपसत्ता विरोध ॥
सहज घडलियानें संकटें जाण सिद्ध ॥
ह्मणुनि मज न वाटे कांहिं या दुर्दशेचें ॥
अवघड परि व्हावें काय मागें जनांचें ॥

नाईक—अहो, तुम्ही हें आपलं रडगाणं ऐकवीत असंच आह्माला रस्त्यावर का उभं करणार ?

विचार०—नाहीं बाबांनो, तुम्ही न्याल तिकडे तुमच्या बरोबर येणार !

नाईक—चला तर आह्मी तुह्माला नेऊन हुकमाप्रमाणं अगोदर चौकीवर ठेवणार.

विचार०—ठीक आहे—(चालतांना)—प्रिये, **सत्तेचं सामर्थ्य कसं असतं तें पाह्यलंसना ?**

(चाल—जबके कलं०)

होते ज्यावर रुष्ट तयाचें कुल गुणही मग मुळिं न बघे ॥ पार धुळीला मिळविते ती ह्मणुनि भीति तिजला अवघे ॥ उद्भवते ती सत्ता जरि ह्या जनांमधूनचि एकमतें ॥ त्यांतील एका वरुनि अनेकां मग त्या करवीं नमीवते ॥ शहाणपण न चले सत्तेशीं विरोध तिजला नच सोसे ॥ तिच्या प्रसादीं सुख-जीवन तें तद्भावीं जगणेंच नसे ॥ ती ह्मणुनि असावी योग्य करीं ॥ ....

मुद्रण०—

.........सुजनांची गति तरिच बरी ॥

आत्या०—

नातरि दुर्गति याच परी ॥ ती० ॥

(जातात.)

(दुसऱ्या बाजूनें लोक हळहळत येतात.)

एकजण—नेलें हो नेलें. पहा त्यांनाच किही धरून नेलें.

दुसरा–आपल्या उन्माद नांवाला योग्य असेंच त्या अधिकाऱ्यानें केलें.

तिसरा–अहो आमचें एक मोठें आधारस्थलच गेलें.

चवथा–पण इकडून हे पाद्मलेत का कोण आले?

(उन्माद येतो. लोक बाजूला होतात.)

उन्माद्–अरे, काय हे लोक वेडे तर नाहींत? कां उगीच गर्दी यांची जिथं तिथं ही? शेताच्या कुंपणाप्रमाणें यांच्या सर्व संरक्षणाची जबाबदारी आमच्यावर असतां मूर्खपणानं ही रिकामी हळहळ कां?

एकजण–कुंपणच खरं; पण एखाद वेळ तेंच सरपण होऊन शेत जाळायला असं निघाल्यासारखं दिसतंय ह्मणून!

उन्माद्–अगदीं झूट आहे! त्या विचारस्वातंत्र्याचे शिकवणीनं ह्या भलभलत्या कल्पना तुमच्या मनांत शिरल्या आहेत.

दुसरा–पण त्या अनुभवशीर ठरल्या आहेत.

उन्माद्–बस्स बस्स; चला, जा आपापल्या घरोघर. तुमची काळजी आह्मांला काय कमी असते?

तिसरा—त्याबद्दल शंकाच नसते; पण कधीं कधीं अधिकाऱ्यांच्या लहरींनं अगर गैरसमजानं अनुभवांत मात्र विपरित दिसतें,

चवथा—आन् म्हणूनच तर अशी तक्रार होते.

(लोक जातात.)

उन्माद—पहा हें. विचारस्वातंत्र्यामुळं लोक कसे उद्दाम होत चाललेय ते. बेलाशक रूबरु उत्तरं देऊन राजशासनाचा उघड असा अपमान करतात. मग आतां हाच गुन्हा त्या विचारस्वातंत्र्यावर बिनतोड सजवून त्याला व त्याच्या सर्व परिवाराला एकदम अटकविण्यांत झालेली ही दंडेली साफ पचवण्याचा उद्योगाला लागलं पाह्यजे. चला. यावेळीं मात्र आमचे राजकुमार एकतंत्रजी नेहमीं ह्मणत असतात तसला अंमलबजावणीचा प्रकार होतोय खरा:—

(श्लोक)

आधीं क्रिया मग विचार करूं तियेच्चा ॥
शिक्षा अगोदर तपास पुढें गुन्ह्याचा ॥ पूर्वींच

अंमल बजावुनि त्यास पाहूं ॥ आधार नंतर असा अधिकार वाहूं ॥

(ऐटीनें निघून जातो.)

(दुसऱ्या बाजूनें रक्तपातास घेऊन असंतोष येतो)

असंतोष—(रक्तपातास)–जा. असाच धांवत जा. आन् तो यावेळीं आपल्या ऐन अंमलबाजीच्या ऐटींत आहे तोंच उडव एकदम. जवळपास कोणी नाहीं. हां. पळ. (रक्तपात जातो. पडद्यांत अवाज) शाबास! भलेबहाद्दर यांचें नांव काम. आतां आपण इथं रहा कशाला? बजावलेली कामगिरी नायकास सांगून पाठ थोपटून घेऊं, आन् ती राजनिष्ठा पोर आतां कशी वश होत नाहीं तें पाहूं.

(पळत निघून जातो.)

प्रवेश पांचवा.

(स्थळ, श्वेतपुरी.–एकतंत्र व त्याचीं कारस्थान, चित्तक्षोभ मतलबादि मंडळी दिवाणखान्यांत मजा मारीत बसली आहे. असा देखावा.)

दोन नाचणारीं मुलं–(हातांत दारूच्या कुप्या घेऊन पुढील पद्य ह्मणत नाचत येतात.)—

(चाल–कुइ बोलो किसमका०)

ह्या दारू असे ही किती चीज मारू ॥ ह्या दा० ॥ प्याला जरी नित्य झालाच कृत-कृत्य त्याला पहा सत्य तो सौख्य मेरू ॥ ह्या दारू० ॥ सेवील जो हीस त्याच्या भवाब्धीस होईलची खास ही एक तारूं ॥ ह्या दारू० ॥

एकतंत्र– (मुलांच्या हातच्या कुप्या घेऊन)— अं: ! ही या गाण्यांतली कल्पना आपल्याला बिलकुल पसंद नाहीं. आपण तर हा पेला ह्मंजे असं समजतों.

(चाल—नजर जहर मारा०)

मूर्तिमंत अंमल हा ॥ वागवूं करांत पहा ॥ मूर्ति० ॥...........

सर्वजण–ओ हो ! अगदीं बराबर. ही मात्र कल्पना बरोबर खरी ! (पेले भरूं लागतात.)

एकतंत्र—

......नीच लोकमत तयास टाकुं दडपुनी॥
वरुनि राजसत्ता मग भोगुं मजा चैन अहा ॥
॥ मूर्ति० ॥

सर्वज०—बोला तर मग " अंमलबाजी की जय !

(पेलें झोंकतात. जासूद येतो.)

एकतंत्र—कायरे, तडिद्वेगा, काय आहे ?

तडिद्वेग—महाराज, उत्पातावर गेलेल्या आपल्या उन्मादरावांनीं तिकडे आर्यमंडल देशांत आपली कामगिरी मोठ्या सक्त मेहनतीनं चालविली आहे, याबद्दलची आपण कळीवण्यास सांगितलेली हकीकत ऐकून दरबारची मंडळी फार खुष झाली. आणि महाराणीस ती सादर करतांना आपल्या विनंतीप्रमाणें ह्या कारस्थानरावांस दरबारची चिटणीसी देण्याची शिफारस तुमच्या करितां आपण जरूर करूं असं आपल्याला कळवायाला त्यांनीं सांगितलं आहे. (जातो.)

सर्वजण—(आनंदानें टाळ्या वाजवून)—वाहवा ! वाहवा ! अंमल हळु हळू येत चाललाय खरा !

(पेले भरूं लागतात.)

एकतंत्र—

......राज्य कारभारीं ॥ यश मिळूनि या परी शिरुं हळू हळूच तरी ॥भोगुं मजाचे०॥

सर्वजण (पेले उचलून)—बोला तर "उन्माद रावकी जय !" (पेले झोंकतात.)

तडिद्वेग (घाईघाईनें प्रवेश करून)—महाराज महाराज, एक अतिशय आनंदाची बातमी आली आहे. आपण कांहीं तरी मला इनामच दिलं पाहिजे या वेळीं.

एकतंत्र—हां हां । अरे पण बातमी सांगायच्या आधींच इनाम का ?

तडिद्वेग—बातमी सांगतोंच. ऐकावं. हें पहा, आपल्या उन्मादरावांनीं हल्लीं कांहीं एका मोठ्या तोहमतीवरनं विचारस्वातंत्र्याला त्याचे कुटुंबांतल्या सर्व माणसांसुद्धां एकदम पकडून त्यांची सक्त चौकशी चालविली आहे. ते सर्व गुन्ह्याचे कागदपत्र आत्तांच एक सांडणीस्वार घेऊन प्रधानजीकडे जातांना भेटला त्यानं हें सांगितलं. (जातो.)

सर्वजण (टाळ्या वाजवून)-शाबास, शाबास ! उन्मादा शाबास ! (पेले भरूं लागतात.)

एकतंत्र-

......जेंवि कारभार करीं ॥ वैरिही तथा-परी ॥ आलियास तरिच खरी ॥ भोगु मजा० ॥ ....

सर्वजण-(पेले उचलून) बोला, एकतंत्र महा-राजकी जय ! " (पेले झोंकतात.)

(जासूद खिन्नमुद्रेनें पुन: येतो.)

एकतंत्र-अरे हा आला पुन्हां !

सर्वजण-मग भरूं या पेलाहि पुन्हा !

तडिद्वेग-(एकीकडे)-पण आतां मात्र ते तसेच लवंडावे लागतील हें कुठें माहीत आहे यांना !

एकतंत्र-आज हा एकाहून एक वरचढ अशा अनेक आनंदाच्या बातम्यांनीं आपल्याला अजीर्ण करणार ?

तडिद्वेग (एकीकडे)-भिऊं नका. या अतां-च्या बातमीनें सप्पाटून रेचकच देणार !

एकतंत्र—

......राज्य कारभारीं ॥ यश मिळूनि या परी शिरुं हळू हळूच तरी ॥भोगुं मजाचे०॥

सर्वजण (पेले उचलून)—बोला तर "उन्माद रावकी जय !" (पेले झोंकतात.)

तडिद्वेग (घाईघाईनें प्रवेश करून)—महाराज महाराज, एक अतिशय आनंदाची बातमी आली आहे. आपण कांहीं तरी मला इनामच दिलं पाहिजे या वेळीं.

एकतंत्र—हां हां । अरे पण बातमी सांगायच्या आधींच इनाम का ?

तडिद्वेग—बातमी सांगतोंच. ऐकावं. हें पहा, आपल्या उन्मादरावांनीं हल्लीं कांहीं एका मोठ्या तोहमतीवरनं विचारस्वातंत्र्याला त्याचे कुटुंबांतल्या सर्व माणसांसुद्धां एकदम पकडून त्यांची सक्त चौकशी चालविली आहे. ते सर्व गुन्ह्याचे कागदपत्र आत्तांच एक सांडणीस्वार घेऊन प्रधानजीकडे जातांना भेटला त्यानं हें सांगितलं. (जातो.)

सर्वजण (टाळ्या वाजवून)-शाबास, शाबास ! उन्मादा शाबास ! (पेले भरूं लागतात.)

एकतंत्र-

......जेंवि कारभार करीं ॥ वैरिही तथा· परी ॥ आलियास तरिच खरी ॥ भोगु मजा० ॥ ....

सर्वजण-(पेले उचलून) बोला, एकतंत्र महा· राजकी जय ! " (पेले झोंकतात.)

(जासूद खिन्नमुद्रेनें पुन: येतो.)

एकतंत्र-अरे हा आला पुन्हां !

सर्वजण-मग भरूं या पेलाहि पुन्हा !

तडिद्वेग-(एकीकडे)-पण आतां मात्र ते तसेच लवंडावे लागतील हें कुठें माहीत आहे यांना !

एकतंत्र-आज हा एकाहून एक वरचढ अशा अनेक आनंदाच्या बातम्यांनीं आपल्याला अजीर्ण करणार ?

तडिद्वेग (एकीकडे)-भिऊं नका. या अतां· च्या बातमीनें सप्पाटून रेचकच देणार !

तडिद्वेग—(एकीकडे) पण आतां कशाला तिची मी आशा ठेवूं.

एकतंत्र—अरे सांग; आं ? असा उगाच उभा कां ?

तडिद्वेग—महाराज, वर्तमान थोडं वाईट आहे.

एकतं०—काय ह्मणतोस ? वाईट वर्तमान आहे ? मग तूं आपली बक्षिशी घालवणार !

तडिद्वेग—(एकीकडे) आली नव्हतीच ती हातांत, मग काय त्याचं दुःख वाटणार !

एकतंत्र—कायरे, काय बातमी आणली आहेस आणखीं ? हें बघ तुझ्या या सर्व खुषखबरीबद्दल तुला चांगली बक्षिशी देऊं.

सर्वजण—बरं ऐकूं तरी ह्या काय आहे तें ?

तडिद्वेग—महाराज, उन्मादरावांचा खून झाला !

सर्वजण—(दचकून)—काय ? खून ? कोण सांगतो ?

तडिद्वेग—तो देवडीवर एक स्वार आलाय तो. दंडेलपंतांनीं त्याला पाठीवलं आहे. मघांच्या सांडणी-स्वारा पाठोपाठच निघाला तो.

एकतंत्र–तर मग अलबत. त्या विचारस्वातंत्र्या-चंच अंग या कामांत असलं पाह्यजे.

सर्वजण–अगर त्याचंच अंग यांत आहे हें त्याज-वर शाबीत तरी करीवलं पाह्यजे.

एकतंत्र–हेंच खरं बस्स, पुढें करा ह्या मजाचिजा! चला त्या स्वाराला घेऊन थेट असेच दरबारांत जाऊं.

सर्वजण–आन् विचारस्वातंत्र्याविरूद्ध चहूंकडे आग लावून देऊं.

एकतंत्र–या प्रकरणीं आतां आकाशपाताळ एक करून राजदरबारच काय, पण सारी ही श्वेतपुरी हाल-वून सोडूं.

सर्वजण–आणि आमच्यांतला एक मोहरा गेला त्याचा मोबदला म्हणून विचारस्वातंत्र्याचे सर्वच कु-लावर पुरता वचपा काढूं.

एकतंत्र–

(चाल–कंठ चरचर चि०)

दोषदृष्टि द्वेषबुद्धिच शंकितांतःकरणही ॥ ठेवितों त्या विषयिं करुनी राज्ञिमंत्रं।

सर्वही ॥ कल्पना प्रतिकूल त्याप्रती उठवूं भलत्या चहुंकडे ॥ सपरिवार विचार तो धुळिला मिळे असे घडे ॥ दोष० ॥

(जासुदाशिवाय सर्वजण जातात.)

तडिद्वेग–(एकटाच आपल्याशीं)–पहा कसा उद्योग आहे तो ! प्रत्यक्ष राजकुलीन असतांहि या श्वेतपुरींत यांना कुणी विचारीत नाहीं तें उगीच का?–

(चाल–जा जा कुजुन कु०)

वाः वाः क्षुद्र अधम निंद्य दुष्ट यत्न काय हा ॥ वाः ॥ एकतंत्रि कारभार ह्मणति तोच हा असे ॥ थारा या स्वैरपणा श्वेतपुरिं मुळीं नसे ॥ ह्मणुनि बघाति आर्यमंडलांत शिरूं पहा कसे ॥ वाः वाः क्षुद्र अ० ॥

(जातो.–पडदा पडतो.)

अंक तिसरा.

(स्थळ, श्वेतपुरींतील राजकन्येचा महाल—पात्रें, राजसत्ता एकटीच सचिंत बसली आहे.)

राजसत्ता–(उसासा टाकून)—

(चाल—पाहुनी मुखचंद्र०)

विस्मृतिही अशि कां बरें ॥ झाली हें मुळिं ना कळे ॥उत्कंठित जरि मन बहु खरें॥समाधान मीं करी बळें ॥ परि शंका कांहिं घाबरें॥ नेत्रांचें जळना खळे ॥

—पण माझं बिस्मरण तरी तिकडे खास झालं नसावं. काय करावं मेलं, हें राजकारण या आमच्या प्रेमसंबंधांत किती तरी आड येतय. प्रत्यक्ष समोरासमोर असतांहि चक्रवाक पक्ष्याच्या जोडप्याला जसं रात्रीनं आढवावं तसंच आह्मांला झालं आहे. खरोखर मी महाराणीची मुलगी नसून एखादी सामान्य स्त्री असत्यें तरी बरं होतं. कारण या

प्रेमाच्या बाबतींत तिची स्वतंत्रता मला या माझ्या मोठ्या भाग्यसंपन्न स्थितींत देखील नाहीं. हे या महालांतले क्रीडापक्षी आणि मी सारखीच—

(चाल—वद जाउं कुणा०)

मणि रत्नखचित पंजरीं बसुनि हे जरी सदा सेवीत ॥ स्वाद्वन्न कनक पात्रांत ॥ ऐश्वर्य असुनियां जरी न सुख त्यापरी असे जें प्राप्त ॥ स्वच्छंद वन विहारांत ॥ असमर्थ स्थिति मज तरी अशिच ही खरी सदां अनुभूत ॥ मम जीवन हि परायत्त ॥

(राजकन्येची सखी येते.)

—[तिलापाहून उत्कंठेनें]—सखे समजलं कांग तिकडचं वर्तमान ?

सखी–(एकीकडे खिन्नमुद्रेनें)—सजमलं नाहीं असं कसं म्हणूं ? पण समजलंय असं तरी कसं सांगू ?

राजसत्ता—

(लावणी.)

अग तुझी खिन्न मुद्राच सांगते मजला ॥ ग सखि मजला ॥ सखि तुझी० ॥ कीं वार्ता

ती प्रिय नाहीं ॥ परि सांगचि मजला बाई ॥ तिकुडची ह्मणूनचि पाही ॥ प्रिय गणिव गडे उत्कंठा किति ही मजला ॥ ग सखि मज० ॥

—सांग, सांग लौकर. काय वर्तमान आलंय तिकडनं ? दरबारांत कसली वाटाघाट इतकी चाललीय ती ?

सखो—गडे राजसत्ते, तुझ्या या स्वभावतांच कोंवळ्या मनाला एखादी दुर्वार्ता सांगून मला नाहीं बाई दुःख देववत !

राजसत्ता—नकोग मेली माझ्या त्या मनाची इतकी प्रतिष्ठा—

(चाल—गझल.)

हृच्चिता प्रखर जशी पेटली मशाल गे ॥ सहन करित दाह तिचा अजुनि जे खुशाल गे ॥ व्यसन धारण क्षमत्व, त्यास तरि विशाल गे ॥ हृच्चिता० ॥

—म्हणून ह्मणत्यें. कांहीं असो, तू आपली बेलाशक मला सांगच.

सखी–तर मग सांगत्यें बापडी. ऐक. हें बघ, सध्यां किनई, तिकडे आर्यमंडल देशांत आपले महानुभव विचारस्वातंत्र्य यांच्यावर मोठीच कांहीं एक तोहमत आली असून तुझ्या प्रिय लोकमतासुद्धां त्या कुटुंबांतलीं सारींच माणसं बंदींत पडलीं आहेत.

राजसत्ता (उसासा टाकून)—सखे, माझ्या मनानं मला पूर्ण फसवलं गडे. मला वाटलं होतं, कीं तें आतां कसल्याहि दुर्वार्तेला मुळीं जुमानायचं नाहीं इतकं काठिण झालं असेल, पण नाहीं.

(चाल–बंजाऱ्याची.)

सोशिली निराशा बाई ॥ मन गमे काठिणता घेई ॥ कल्पना व्यर्थ परि होई ॥ दुर्बलतें भारिच कांहीं ॥ वार्ताही करि मज कष्टी ॥ आग्निचिच वृष्टि ॥ मनोरथसृष्टि ॥ दग्धली पाही ॥ ह्या शून्य दिशा मज दाही ॥ सो शि० ॥

—काय म्हणतेस ? त्यांच्यावर मोठीच कांहीं तोहमत येऊन ते अटकेंत पडले आहेत ? अशी काय तरी बाई ती तोहमत असावी ? सखे, इथं असतांना त्यांची चाल रीत तूं सर्व पाह्यली होतीस ना ?—

(चाल—नशिब फिरलें.)

वद् कां ती ॥ दोषक्षम सुंदर मूर्ति ॥ त्या प्रेमल कोमल चित्तीं ॥ करितिल कां अवगुण वसती ॥ विमल तनुकांती ॥ होईल कलंकित कशि ती ॥

सखी—अग म्हणूनच तर आई साहेबांसुद्धां साऱ्या दरबारचं मन त्यांनीं इथं असतांना, अगदीं आपलंसं करून घेतलं; होतं. पण यावेळीं बाई सर्वच कांहीं विपरित झालेलं दिसतंय. आतां दरबारांत पाह्यलं तर त्यांच्या बाजूचं कुणीच कांहीं बोलत नाहीं. लोकमतावर विशेष लोभ करणारे आपले प्रजापक्ष सरदार मानकरीहि यावेळीं अगदीं; चकित होऊन मौन धरून बसले आहेत !

राजसत्ता—काय करूं सखे, आई साहेबसुद्धां कि ग यावेळीं इथं नाहींत.

सखी—आणि तें तर विशेषच फावलंसं दिसतंय त्या एकतंत्राला यावेळीं आपला चांगला द्वेष उगवून घ्यायला !

राजसत्ता–म्हंजे ? तो का या प्रकरणांत आहे आणखी ?

सखी—होंय. त्यांचींच तर सारी मंडळी या प्रकरणाचे मूळाशीं आहे म्हटलं तरी चालेल. तिकडे आर्यमंडलांतील उत्पात राक्षसाचा बंदोबस्त करण्यांत मोठी मेहनत घेतल्याबद्दल जी त्यांची वाहवा झाली आहे, तिच्या योगानं दरबारांत त्यांना भारीच कांहीं महत्व मिळून या कामांत सर्व कसा भरंवसा त्यांच्या-वरच सोंपवल्यासारखा दिसतोय. तो एकतंत्र तर मुद्दामच गेलाय तिकडे असं मी ऐकलं.

राजसत्ता–हाय हाय ! हें तर प्रत्यक्ष वैऱ्याच्या हातांत मान पडावी असं झालं ? मी त्याचा निषेध केल्यापासनं तो तिकडच्या वाईटावर किती आहे हें तुला माहीत आहेच. सखे, कसं करूं ग ? माझा या वेळीं मेला कांहीं तरी तिकडे उपयोग होतोय का? सखे—

(चाल–असेल माझा धर्म.)

उपाय हाय न दिसे करिल जो मुक्त संकटांतूनी ॥ एक ईश्वरप्रसाद अन्य न समर्थ त्या वांचूनी ॥

सखी—मग मला वाटतं असंच करावं गडे. आ-ईसाहेब जरी चार दिवस इथला सर्व राज्यकारभार पूर्ण मुखत्यारीनं प्रधानजींवर सोंपवून ईशप्रसाद स्वामीच्या दर्शनाला गेल्या आहेत, तरी असल्या विशेष महत्वाच्या प्रकरणांत त्यांच्या संमतीवांचून कांहीं अखेर निकाल व्हावयाचा नाहीं हें खचित. याकरितां, चल, आपणहि स्वामींच्या अश्रमाकडेच जाऊं. यावेळीं अनायासं हें भाग्योदयपर्व आल्यामुळं गुरुमहाराज समाधि विसर्जन करून गुहेबाहेर येणार आहेत, तेव्हां दर्शनाचाच योग आहे हा ! त्यांची जशी तुमच्यावर तशीच विचारस्वातंत्र्याचे कुलावरहि पूर्ण कृपादृष्टि आहेच. तेव्हां तेथें त्यांच्या सन्निध सर्वांना इष्ट अशाच गोष्टी घडून येतील.

राजसत्ता—खरं गडे, हें तूं फार उत्तम सूचवलंस. चल तर आत्तांच तिकडे निघण्याची आपण तयारी करूं —

(चाल—सुविहित जाहलें.)

चल चल जाऊं ॥ चल जाऊं ॥ चल सखि जाऊं ॥ पाहुं गुरू चरण ॥ करिल भयहरण ॥

शरण त्या होऊं ॥ चल० ॥ व्रतचि तयांचें आर्त जनावन ॥ नुपेक्षितिल जरि पदनत होऊं ॥ चल० ॥

(जातात.)

प्रवेश दुसरा.

(स्थळ, आर्यमंडल देश—तुरुंगाच्या बाहेरील भाग—पात्रें, खिन्नमुद्रेनें देशाभिमान प्रवेश करतो.)

देशाभिमान–अरेरे, मूर्तिमंत सद्गुण हे ! आणि सद्गुण ह्मंजे ईश्वराचे अंश. यांना हे असे हाल-कष्ट देवा अथवा त्याहूनि प्रबल अशा दैवा, काय हे तुझे निर्दय खेळ ! आपल्या सद्गुणैश्वर्यानें ज्यांनीं नक्षत्राप्रमाणं लोकसमाजामध्यें चमकत असावं, आणि आंगच्या नैसर्गिक राजतेजानं प्रधान प्रतिनिधि मंडळांतहि ज्यांनीं विशेष दीप्तिमान दिसावं, अशीं हीं पृथ्वीच्या मोलाचीं एकेक इहलोकचीं खरीं पण दिव्य रत्नं, अत्यंत नीच व दुर्वृत्त अशा शेंकडों नरपशूंच्या अमंगळ संगतींत अशीं धुळीमध्यें लोळत पडावींतना ?

हाय हाय, यांच्या या निरपराध छळाविषयीं इथून तिथून साऱ्यांनाच अंध बधिरता आली, तशी मला देशाभिमानालाहि येऊन मी जडमूढ पाषाण बनून अचेतन पडलों असतों तरी बरें झालें असतें ! चित्तक्षोभ, पक्षपात, कारस्थान, मतलब, दंड अशा एकतंत्री मंडळीची वडाळी माजून मूर्तिमान् अनेक सद्गुणांचे असे हे खुशाल बळि पडावेत, हें पाहायला जिवंत राहण्यापेक्षां खरोखर मरणच बरं. पण आतां या आर्यमंडलांतून एक महानुभव विचारस्वातंत्र्य नाहींसा झाल्यावर त्याच्या मागें आमची तीच वाट ठरलेली आहे ! तेव्हां प्रभुची मर्जीच अशी असल्यास तिजपुढें कोणाचें काय चालणार आहे ? ईश्वरेच्छेला सर्वांनीं सादर असलेंच पाहिजे. असो, या दुर्धर अवस्थेचं आम्हाला भोगायचं असं आयुष्य आतां फारसं राहिलेंच नाहीं. तेव्हां तिचा आतां विशेष खेद तरी कशाला बाळगा ? आतां हें मन दगडासारखं अविकारी बनवून या तुरुंगामध्यें जावं, आणि माझ्या मित्राला, त्याच्याशी काय, पण त्याच्याप्रमाणेंच सर्वांच्याहि होत असलेली नशिबाची अखेरी,

अन्यायाची पराकाष्ठा, निराशेची परमसीमा, कळवावी, झालें !—अहो, आर्यमंडलस्थ संपूर्ण दुर्दैवी प्रजाजनांनो, गेला हो गेला; अनेक अस्मानी सुलतानी काठिण प्रसंगांत तुमचा अप्रार्थित कैवारी, अनभिषक्त राजा, अकुतोभय पुढारी असा विचारस्वातंत्र्य तुमच्यातनं पार नाहींसा झाला ! सांप्रत या आर्यमंडलांत आपणच राजाधिराज होऊन बसलेल्या त्या एकतंत्र व तदनुयायी महाक्रूर राक्षसांनीं त्याचा बळि कीं हो घेतला ! आणि तुमची वृद्ध सुधारणा ताई, तुमची देवी मुद्रणकला, दिलप्यार लोकमत, आणि हा तुमचा नम्रसेवक देशाभिमान, हे सर्व तुमच्या प्रमाणेंच अनाथ झाले !—अथवा त्याच्यामागं हेहि तुम्हाला खास खास अंतरले ! (जातो.)

प्रवेश तिसरा.

(स्थळ, तुरुंग—राष्ट्रजाप्रती जपमाळ ओढीत बसली आहे. मुद्रणकला दळते आहे असा देखावा.)

लोकमत–(माती वहात असतां आपल्याशीं)–

(चाल—अफ़्सोस खुदाराहि)

ही पहा या कालीं ॥ काशि दैवगती फिरली ॥ अति कष्टदशाही आली ॥ भोगावया या कपाळीं ॥ ....

मुद्रण०—

प्रभुनें कां निद्रा केली ॥ कां अमुची वि-स्मृति पडली ॥ कीं कांहीं अगळिक घडली॥ ह्मणुनि हीं उपेक्षा झाली ॥.........

लोकमत—

.........॥ पडावें दुर्गतीला बळी ॥ अक्षरें-च दिसतीं लिहिलीं ॥ कांती या अमुच्या निढळीं ॥ अनुभव हा वेळोवेळीं ॥.........

विचारस्वा०—

.........॥ प्रभुला जी आवडली ॥ स्थिति पाहिजे ती भोगली॥ दीनांचा असे तो वाली॥ करिलाचि कृपा यथाकालीं ॥—

—बाळा लोकमता, तूं दमला असलास तर घटका-भर बसून विश्रांति घेशील कां ?

लोकम०—

(चाल–धीरे धीरे धीरे०)

नाहीं नाहीं नाहीं नाहीं नाहीं नाहीं ॥ कशिहो बाबा ह्मणतां विश्रांती इथें घेई कांहीं ॥ काम जराही खळतां रक्षक ॥ मारची तडातड देई देई ॥ कशिहो बाबा ०॥

विचारस्वा०—खरंच तें (एकीकडे) मी नेहमींच्या संवयी प्रमाणं सहज याला कळवळ्यानं विश्रांती घे म्हणून सांगतों. पण जसा मी अशा करायला, तसाच हाहि ती पाळायला या ठिकाणीं स्वतंत्र नाहीं पहा.—

(चाल—गझल.)

पिता याचा न मी एथें ॥ न पुत्राचे तया नातें ॥ परस्वाधीनता आमुची ॥ विफल करि धांव ममतेची ॥ इतर सारे तसा हा मी ॥ कुणी कोणा न यो कामीं ॥

आत्याबाई–(मुद्रणकलेस)—बाई, मुद्रणकले, तुला मी जरासा हात लावायला येऊं का ?

मुद्रणक०–(आदरानें)—अहो नको. नको बरं, बन्सं, हें पहा—

(चाल—धाडुनि दिधलें पत्र०)

अनुभवतां हे अधिच अह्मासह कष्ट वृथा या बंदींत ॥ अमुचे हाल हि हे वरि बघुनी क्लेश तुह्मांतें बहु होत ॥ तेच तुह्मा अति आयासप्रद असुनी वृद्धावस्थेंत ॥ देउं कसे मग अधिक श्रम हे नाहिं दिले कधिं माहीत॥

रखवाल०–(आत्याबाईस मागें ओढून)–ए थेरडे, तुला काम करण्याचीच हौस आली असेल तर जा तिकडे जाऊन कैद्यांच्या भाकऱ्या भाज ! यांची नेमलेलीं कामं यांनींच केलीं पाह्यजेत ! तुझ्या ह्मातारपणाकडं पाहून मेहेरबानींनं तुला काम न करण्याची चांगली माफी मिळाली असतां ही हौस कां ? बघा कीं, देव देतो आन् कर्म नेत म्हणतात तें हें ! हें बघ सांगतों. इथं यांच्यांत अशी लडबड करशिल तर खबरदार ! पाठीवर कोरडेच खावे लागतील. चल हो मागं !

मुद्रण॰–अरे बाबा, आमच्या देखत नको. त्यांना असं तडातड टाकून बोलूंस. आमच्यानं नाहीं ऐकवत. तुझ्या पायां पडत्यें मी.

विचार॰–खरं म्हणते आहे ती. आमच्या ताई-च्या ऐवजीं पाहिजे तर आम्हाला जास्त शिक्षा कर. पण आमच्या समक्ष तिचा तरी असा अपमान करूं नकोस—

(चाल—स्वभावाचा साळया॰)

हीतें पक्या शब्दानें हीत दुखवीलें ॥ नाहीं थोडे ही श्रम देऊन शीणवीले ॥ अल्पकाळ तरि असे आतां हा हिचा आह्मा सद्वास ॥ हिज विषयीं या पूज्यदृष्टिला बघवेना उप-हास ॥ आह्मी सर्वांनीं बहु जपून सुखवीलें ॥

रख॰–असेल, तुमची म्हातारी म्हणून तुम्हाला अगदीं देवासारखी. पण त्या घरच्या गोष्टी. त्याचं इथं काय ? इथं हुकूम बजवावा लागतो.

विचार॰–(एकीकडे)—अथवा उघड आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांचींच प्रतिबिंबं हीं. त्यांच्याहून यांचं स्वरूप वेगळं कुठून असायला ! उलट—

(साकी.)

रविहि तसा नच तापद जैसी तप्तवालुका असते ॥ वरिष्ठांहुनी कनिष्ठांत तशी चढत तीव्रता येते ॥ क्रम या सत्तेचा ॥ आहे हा बहु नवलाचा ॥

(देशाभिमान येतो.)

देशाभिमान—अहो रखवालदार नाईक साहेब, जरा मेहेरबानी ठेवा. हें पहा, अशीं देवमाणसं तुम्हाला चार दिवस हातीं वागवायला सांपडलीं आहेत हें तुम्ही आपलं मोठं भाग्य समजा. आदल्या जन्मीचं पदरीं तसंच कांहीं मोठं पुण्य असल्यावांचून अशा निर्दोषरत्नाची सदोषा प्रमाणं ही विटंबना करण्याची योजना कांहीं तुम्हाला आली नाहीं खचित!. या करितां तो आपला पूर्व जन्मिचा पुण्यस्वभावच जरा यांच्याशीं वागतांना हल्लीं ठेवलात, तर अशानें या जन्मांत त्याची वृद्धिच होऊन पुढें आणखीहि तुमच्या तो चांगला भाग्योदयालाच कारण होईल. बरं, यांच्याशीं मला थोडा वेळ बोलूं देतां कां? मी यांचा एक मित्र आहे; व यांच्यावरील हल्लींच्या या आपत्तींत यांच्यासाठीं थोडी फार खटपट करणार आहे.

रखवाल०—तर मग तुह्माला यांच्याशीं बोलूं देण्याची आहे परवानगी, जा. मात्र यांच्या कामाचा फार वेळ खोळंबा करू नका. (जातो.)

देशाभि०—परमेश्वर तुमचं कल्याण करो.

विचार०—मित्रा देशाभिमाना, माझ्याकरतां तुला किती तरी कष्ट पडताहेत हे !

देशाभि०—त्यांचा तसा इष्ट परिणाम झाला ह्मंजे त्यांचें मला कांहीं वाटणार नाहीं.

आत्या०—पण अधिकाऱ्यांचे अझुनी अनिष्ट ग्रह यांच्या संबंधाचे बदलत नाहींतच ना ?

देशाभि०—ग्रहच ते. त्यांची शांति बळी घेतल्यावाचून कोठून होणार ?

विचार०—पण तो घेऊन मग तरी ती होवो ह्मंजे झालं—

(चाल—सुनइ दिलदार०)

अनुख मजला नसे कांहिंच मरणाचें ॥
अंतच जाहलें जरि दुःख सकलांचें ॥
परी करुनि असा अमुचा सकुळ नाश ॥
पसरतील हे जनांबारें बाटले पाहा ॥

देशा०–(एकीकडे) आपल्या दुःखानें नेहमीं रडणारे प्राणी आम्ही सारेच आहों हें. पण दुसऱ्याच्या दुःखांची स्वतःच्या दुर्धर अवस्थेतहि कळकळीनें आठवण ठेवणारा असा या माझ्या मित्रासारखा मात्र विरळा ! कोणत्याहि हतभाग्य देशाचा उद्धार त्यांत अशींच माणसें निपजल्यानें होत असतो. पण देवा, त्या पायीं ह्या माणसांना किती तरी हालअपेष्टा भोगाव्या लागतात ह्या ! ह्यांच्या लोकाभ्युदयकारक वृत्तीचें हेंच यांना इहलोकीं फल असावें काय ?

लोकमत–(देशाभिमानास)—काय हो, शेवटीं आमच्या या शिक्षा कायमच ठरल्या ना ? बाबा आह्माला अंतरणार, आन् आम्ही त्यांच्या मागं जीव धरून राहिलोंच तर या कारागृहांतल्या अशा कष्टकर स्थितींत सर्व कुजून मरणार !

देशाभि०–होय बाबा, सर्व कांहीं प्रयत्न झाले. गगनमंडल हि भेदून जाईल एवढा टाहो फोडला; पण व्यर्थ तुमच्याविषयीं सर्वांच्या दृष्टि कशा बदलून गेल्या आहेत कान बहिरे झाले आहेत. त्यामुळें त्यांना सरळ देखील वांकडें दिसतें व उघड अर्थामध्यें

गुप्त अनर्थ भासतो. कांहीं इलाज चालत नाहीं. तुह्मी मात्र जण त्यांना अगदीं पारखे झालां आहां; निवळ शत्रुच दिसतां. उन्मादाच्या खुनाला कारण तुह्मी. त्यानं चालविलेल्या उत्पाताच्या बंदोबस्ता विरुद्ध लोकांना चिथावून राजशासनाला प्रतिबंधक अशी त्यांची वृत्ति बनविणारे तुम्ही; फार काय पण मागेंच देशपार करून लावलेल्या राजद्रोह पुंडाचे असंतोष विक्षोभ वगैरे कोणी गुप्त हेर या आर्यमंडलांत संचार करतांना कोणाला ह्मणे आढळले, त्या सांथीदारांनाहि आंतून आंग तुमचंच; हें तर काय, पण तुमची राज-निष्ठा जी कुठें सांपडत नाहीं तिजबद्दलहि अशी कल्पना त्यांची करून दिली आहे कीं, पूर्वसंकेताप्रमाणं आतां या भाग्योदयपर्वाचे वेळीं ती महाराणीच्या युवराजास देण्याचा वाङ्निश्चय करावा लागेल म्हणून मुद्दामच तुम्ही ती नाहींशी केली असावी! तेव्हां अशा मनस्वी दूषित कल्पनांनीं भरलेल्या या वातावर-णांत तुमच्या निर्दोषपणाचं स्पष्ट दर्शन होणार तरी कसं? नाहीं म्हणायला आपले ईशप्रसादस्वामीच कांहीं कृपा करतील तर---

मुद्रण क०—खरंच. मग त्यांच्याकडे तरी कोणी जा. ते या संकटांतनं आम्हाला खचित मुक्त करतील.—

(चाल—बाई तूं या आम्र०)

जाहो जाहो कुणी तरी जाहो ॥ गुरुजींना घेउन याहो ॥ वृत त्यांना हें कळवाहो ॥ कृपाघन इकडे वळवाहो ॥

देशाभि०—होय, त्यांच्या अनुग्रहाचा मात्र या प्रसंगीं उपयोग होण्यासारखा आहे खरा. आणि शिवाय इतक्यांत हें भाग्योदयपर्वहि आलं असल्यामुळें त्या निमित्तानं महाराणी साहेबांची स्वारी त्यांच्या दर्शनाला गेलं आहे, तेव्हां या प्रकरणाचा अखेर निकाल स्वामींच्याच विचारावांचून त्या खचित देणार नाहींत असं सर्वांना वाटतं; पण काय सांगूं बाई साहेब, तुमच्या त्वरित नाशाविषयीं तुमच्या वैऱ्यांना इतकी कांहीं घाई झाली आहे कीं, भाग्योदय पर्व येण्याच्या पूर्वींच तुमच्या शिक्षा एकदम अमलांत आणवण्याची त्यांची सक्त खटपट सुरू आहे. मी तोच त्यांचा ठरत असलेला विचार आत्तां ऐकला तेव्हां तो कळवण्या-साठीं आधीं हा इकडे आलों. हल्लींच्या या एकतंत्री

कारभागांत सध्यां हेंहि घडून येणं कांहीं अशक्य नाहीं !

मुद्रण क०—हाय ! तर मग माझा सौभाग्यसूर्य खचित मावळणार !

देशाभि०—(एकीकडे)—बाई, साऱ्या आर्यमंड-लाचं हें एवढंच राहिलेलंहि सौभाग्य आतां नष्ट होण्याची वेळ आली आहे !

आत्याबा०—माझ्या भाऊरायाबद्दल मी आपले हवे तर प्राण देत्यें हो !

देशा०—(एकीकडे)—तसें चालतें तर या मोह-न्यासाठीं हें सारें आर्य मंडल आपल्या प्राणावर उदार नका हो तें ?

लोकम०—देवा ! काय हा आमच्यावर प्रसंग आ-णला आहेस !—

(चाल—शामाकडे जासि०)

हाय कसा पातला ॥ दुर्धर अति घोर प्रसंग हा अपराधा विण शासन हें ॥ पापा विण प्रायश्चित ॥ रोगाविण तीव्र रसायनें ॥ गांजिति व्यर्थ शरीर ॥ हा० ॥ सोसूं कष्ट

कसें तरी ॥ असती ते मरणान्त ॥ परि दु-
र्लौकिक सर्वत्र जो ॥ त्याचें दुःख अनंत ॥हा०

देशा०–(एकीकडे)—हा सर्व देश तुमच्या
करितां असाच हळ हळतो आहे रे !

विचार०–ताई, प्रिये, बाळा ले कमता, अरे हें काय!–

(चाल—पाहिन सिंहास नि०)

ईश्वर निंदा दोष घडे वा, शोकानें या
आपणा ॥ ईश्व० ॥ प्राणाधिक जे जपलों
कष्टि हि ऐसें ज्यामुळें ॥ न्यून लेखितों ऐसें
होइल ईश्वरांश त्या स्वसद्गुणां ॥ ईश्वर०॥

–मित्रा, देशाभिमाना, तूं सुद्धां यांच्या बरोबर
गांहिवरूं लागलास तर आतां मागं यांचं समाधान
कोण करील बरं ?

देशाभि०–हाय ! “ मागं यांचं समाधानं ” हे
शब्द मला ऐकवत नाहींत, मग त्याप्रमाणं वागायला
नं वर मी जिवंत तरी कोठचा राहायला !

विचरा०–ताई, तुजवर जरी अधिकाऱ्यांनीं मेह-
रबानी केल्यामुळें तू आतां मागं सर्वांची काळजी
घ्यायला आहेस हें मी एक मोठं समाधान मानतों.

आत्याबाई–पण तूं तर आम्हाला टाकून जासो-सच ना! मग तुझ्या मागं आमचा तरी प्राण बाबा कशाचा राहता ? (सर्व रडूं लागतात.)

विचारस्वा०–छे छे, असं काय ? सर्वजण अगदींच असा धीर टाकूं नका. ऐका—

(चाल–बाळा जाई परतो०)

धैर्यधरा कांहीं ॥ हृदयीं ॥ धैर्य० ॥ दुःख वेगशामक जरि आहे शोक सुलभ पाहीं ॥ हृदयीं० ॥ निरपराधमरण हेंच आपणासमाधान कीं या समयीं ॥ झटतां लोकहितार्थचि मरतां महत्पुण्य हें कां नाहीं ॥

(एकतंत्र, दंड व रखवालदार येतात.)

एकतंत्र–अरे ! यांनीं तर इथें आपली एक सभाच भरवली आहे!

दंड–आन् तींत आपली रडकथाहि लावली आहे!

देशाभि०–(एकीकडे)—अरेरे ! अशाहि स्थितींत यांना उपहास बुद्धीच आठवली बाहे !

एकतंत्र–अहो विचारस्वातंत्र्य, तुम्ही हें काय चालवलं आहे ?

आत्या०—बाबांनो, क्षणभर आमचं हें अंतःकरण कालवलं आहे !

देशा०—(एकीकडे)—पण या गृहस्थाचं मात्र सौजन्य पार मालवलं आहे !

एकतंत्र०—अहो, ही आपली बायका पोरांची सभा भरवून तींत मोरे तुम्ही अध्यक्षस्थान स्वीकारलेलं दिसतंय; पण हल्लीं तुह्मी शासन देवतेच्या भक्ष्य स्थानीं आहांत याची आठवण आहांत याची आठवण आहे ना ?

देशा०—(एकीकडे (काय करूं) हा अपमान माझ्यानं सहन होत नाहीं ! दुःखावर डागण्या आहेत ह्या ! हा देशाभिमान उग्र दिसण्याला जीं काय कारणं असतात तीं हींच होत !

विचार०—अहो,

(चाल—नवमानस कैसें०)

विसर पडेल कसा आह्मा या स्थितिचा ॥
अनुभव जंवर असा आह्मा या स्थितिचा ॥
तत्स्मारक चिन्हांचा आहे हा शरिरावर भार ॥ त्यांतुनि घडलीं विस्मृति तरि हें रक्षक दक्षचि फार काया बोध तिचा ॥

—तथापि हे नैसर्गिक प्रेमाचे उमाळे आम्हाला थोडा वेळ ओढून असे क्वचित् एकत्र करतात !

एकतंत्र—असं काय ? तर मग थांबा, त्यांनी असं वरचेवर तुम्हाला ओढून एकत्र होण्याचा त्रास देऊ नये म्हणून त्यांच्यामध्ये मोठमोठे दगडी, भिंतीचे पक्के बांधच घालायला सांगू. कोण आहे रे, रखवालदार, या सर्वांना यापुढे असे एकत्र न ठेवतां निरनिराळ्या कोठड्यांत बंद करून टाका. पुनश्च यांची दृष्टादृष्ट नको एकमेकांना !

(रखवालदार विचारस्वातंत्र्यास ओढतो)

मुद्रण०—(आड होऊन)—अहो, मी तुमच्या पायां पडल्यें. पदर पसरल्यें. हवे ते कष्ट करायला सांगा. पण आमची अशी ताटातूट करूं नका.—

(चाल–तुमारे मनमाने त्या०)

नका हो आह्मा दूर असें हें करूं ॥ दूर असें हें करूं ॥ नका० ॥ दोन दिवस हे बोलुं बसूं द्या ॥ पाहूं तरी द्या डोळे भरूं ॥नका०॥

लोकम०–देवा !—

(दिंडी.)

चढविलें तूं अति उन्नत स्थलांतें ॥ पतन ऐसें कां पुढें व्हावयातें ॥ कसें येणें विशक-लित अशी होतां ॥ मिळुनि धुळिला निःशेष पहा जातां ॥

एकतंत्र (आपल्याशीं)—गेलाच पाश्चजेत धुळि-ला मिळून. त्या साठीं तर हा सर्व व्यूह रचला आहे. काय करावं. आमचे प्रधानजी महा शंकाखोर पडले. यांच्या भयंकर गुन्हेगारीची शाबती यांजवर आम्हीं सुरेख करून दाखविली असतांहि ते यांच्या शिक्षा एकदम अमलांत आणण्याचा हुकूम आपल्याच अधि-कारांत देऊन शकांत नाहींत, याला काय म्हणावं राजकारणांत अशी करूं ना करूं बुद्धि काय कामाची? माझ्या हातांत प्रत्यक्ष सत्ता पाश्चज होती या वेळीं; म्हंजे हें आतां येणारं भाग्योदयपर्व कांहीं यांच्या दृष्टीला खचित पडूं दिलं नसतं !

दंड—(रखवालदारास)—अरे पहातोस काय ! यांना अशा या रडगाण्याची नेहमींचीच सवय आहे. तूं त्यांचं ऐकत उभा राहूं नकोस. कर त्यांना एकीकडे.

आन् एकतंत्र महाराज सांगताहेत त्याप्रमाणं वेगवेगळ्या कोठड्यांत नेऊन अटकावून टाक. हटेलपणा करतील तर जरा समजीव म्हंजे झालं !

(दंड व एकतंत्र जातात.)

देशा०–(त्वेषानं) अरेरे ! काय हा उपमर्द ! असं वाटतं कीं—

विचार०–(त्याला आडवून)—हां हां, देशाभिमाना, हें काय ? अरे, ईशप्रसादस्वामींच्या सन्मुख महाराणीनं आपली मुद्रणकला मला अर्पण करून हा प्रजाप्रतिनिधित्वाचा अधिकार सोंपविला, त्यावेळींच, पुढें कसल्याहि अन्याय जुलुमाचा प्रतिकार केवळ राजमान्य उपायांनींच करण्याचं ज्यांनीं शपथपूर्वक व्रत धारण केलं आहे; त्यांनीं कसल्याहि हाल अप्रतिष्ठांस गंभीरपणानंच सादर असलं पाहिजे, तें व्रत किती एकनिष्ठेनं पाळलं जात आहे याची परीक्षा पाहण्यासाठींच ईश्वरी इच्छेनं हे प्रसंग येत नसतील म्हणून कशावरून ? आपण यांना काय म्हणून म्हणावं; अथवा दुःख अगर कमीपणा मानून असा त्वेष आणावा ? अशा वेळीं ईश्वरेच्छेवर निष्ठा हाच आपला

मनोधर्म; प्राणांतींही सत्वास न ढळणं हेंच आपलें कर्तव्यकर्म; आणि असंख्य लोक आपल्या या निरपराध छळाचे दुःखांत वांटेकरी आहेत हेंच आपल्या उत्तम समाधानाचें मर्म लक्ष्यांत ठेवलें पाहिजे. असो, चला;

(चाल-सोच समजय नादा०)

भेट शेवटची आतां ॥ घेऊं पाहूं सप्रेमानें॥ शेवट० ॥ सद्गुरु ईशप्रसादस्मरणं ॥ कंठूं या शेषायुष्यरिता ॥ भेट शेव० ॥

(सर्वजण भेटून आक्रोश करतात. पडदा पडतो.)

प्रवेश चवथा.

(स्थळ—अरण्य. पात्रें—राजनिष्ठेला घेऊन असंतोष येतो.)

राजनिष्ठा—(मधेंच थांबून,)

(चाल-कोंध तिला पाहिन०)

वद कुठें मला नेशी ॥ प्रतिपदिं आतां शंका मज वाटे ॥ विश्वासें जणुं ऐसें मज खासे ॥ फसवीशी ॥ वद० ॥ निबिड घोरवन निर्जन हें ॥ खगमृगही कुणि नाहीं ॥ या

स्थलिं एकलि मी ॥ अगबाई ॥ पाउलही ॥ मी
नाही ॥ बघ कांहीं ॥ हलत अशी ॥ वद० ॥

—नाहींच मी आतां पुढं येत. सांग, मला तू कोणी-कडे घेऊन जाणार ?

असंतो०—तुला ऐकूनच घ्यायचाय का माझा एकदां स्पष्ट बेत ?

राजनि०—होय. तरच माझं पाऊल आतां पुढें हलेल ?

असंतो०—मी म्हणत होतों कीं चांगल्या एखाद्या निवाऱ्याच्या जागीं गेलों म्हंजे तिथं तुला मी आपलं सर्व अंतःकरण उघड करून दाखविलं असतं !

राजनिष्ठा (चपापून)—काय ? त्याकरतां कां तूं मला त्या बंदींतनं काढून या अरण्यांत आणलंस ? तूं मला माझ्या आईबापाकडे नेऊन पोंचवीत नाहीस?

असंतोष०—चः ! तूं तर मी सांगायच्या आधींच सर्व बरोबर ताडलंस !

राजनिष्ठा—तर मग तूं हा माझा खचित विश्वासघात केलास. माझी मान कापलीस. मला आगीतनं काढून फुपाट्यांत आणलंस. तिथं मी एकदम जळून

भस्म झाल्यें असत्यें, पण आतां इथं होरपळून प्राणां-
तिक यातना सोसाव्या लागणार !

असंतोष—मग कां बरं ह्या उगाच आपल्याशीं बाईट कल्पना चालविल्या आहेस ? तुला त्या बंदी-वासांतनं आणि काळाच्याहि जबड्यांतनं युक्तीनं सोडवून इकडे आणण्याचा माझा हेतु जसा तू बरोबर ताडलास तसाच आनंदानं तो चटकन मान्यहि केलास तर, तुझ्या या सुकुमार देहाला योग्य अशा फुलांच्या शेजेवर तुला ठेवीन. तुझ्या नाजुकपणाला इतकाहि ताप होऊं देणार नाहीं मग कां ही उगाच भीति बरें ?

राजनिष्ठा (आपल्याशीं)—हाय ! आतां मात्र मी याच्या पुरी तावडींत सांपडल्यें खरी ! हें निर्जन अरण्य; पशुपक्षिसुद्धां इथं दृष्टीस पडत नाहींत, तेव्हां इथं मी साह्य तरी कुणाचं मागूं ? कुणाला माझी करुणा येईल ! आतां मी काय करूं ? कोण माझ्या रक्षणाला या ठिकाणीं धांवून येईल? हा मेलाय—नकोग बाई, याच्या त्या चंचल व आतुर दृष्टीकडे माझ्यानं बघवत दिखील नाहीं.

असंतोष—तूं नाहीं का ऐकत ? असा आपल्याला व्यर्थ त्रास का करून घेत आहेस ? हें पहा, मनुष्यानं चालल तितकाच हट्ट करावा. ज्यानं तुला राजद्रोह नायकाच्याहि हातावर तुरी देऊन मोठ्या शिताफीनं इतक्या दूर एकीकडे आणली, तो आपले हेतु सिद्धीस नेल्यावाचून राहील काय ? गोडी गुलाबानं नाहीं तर मग बलात्कार—

राजनिष्ठा—अगबाई ! मला याचे हे शब्द ऐकवत नाहींत ! कसं करूं ? कुठे पळूं ? कुणाला हाक मारूं ?

असंतोष—तुझी आपली हौसच असली, तर फिर-बापडी जराशी. अशीहि तुझी भयचंचल मूर्ति मला कांहीं कमी मनोहर दिसायची नाहीं. घटकाभर हेंच नेत्रसुख अनुभवीत मी स्वस्थ बसतों! जा, पळ, मार हाका. माझ्याशिवाय तुला कोणी उत्तर देणार नाहीं. आन् अशी रिकामी धांवपळ करकरून दमलीस म्हंजे तुझ्या या नाजूक तनूला फुलासारखी अलगत झेलून घट्ट आलिंगन द्यायलाहि मीच इथं आहे !

राजनिष्ठा (त्याच्या बोलण्याकडे लक्ष न देतां आपल्याशीं)—इकडे कांहीं मंजुल ध्वनी ऐकूं येतोय कां?

असंतोष—होय, तुझ्या पायांतल्या पैंजणांचा होतोय खरा !

राजनिष्ठा (आपल्याशींच)—घोड्याच्या टापा-हि वाजतात ?

असं०—भीतीनं तुझा ऊर धडधडतोय, त्याचा हा भास असेल तुला !

राजनिष्ठा—हा धुराळाहि ?

असं०—अग रानांतली वावटळ ती !

राजनि०—(आनंदानें)—क्वचित ही कोणा राजाचीच स्वारी येत आहे ! अहाहा ! परमेश्वरानं माझं गाऱ्हाणं ऐकून माझ्या रक्षणा करतांच कुणाला तरी पाठवून दिलंय हें !

असंतो०—व्यर्थ आशा व कल्पनांनीं हिला वेड लागणार; आन् आपल्या बरोबर ही मलाहि तसाच वेडा करून ठेवणार यांत संशय नाहीं. अग खुळे, मृग-जळाकडे जसं हरिणीनं धांपा टाकीत उगाच जावं, तसं या मनोमय कल्पनांच्या मागं धांवण्याचा कां बरं शीण हा करते आहेस ? या शून्य व भयाण अरण्यांत कसला मंजुळ अवाज ? कुठली राजाची स्वारी ?—

(पाहून चपापतो)—अरे खरंच. हें कोण बरं येताहे? मेण्यांतनं ही एक स्त्री उतरली. बरोबरच्या इतमामावरनं कुणी राजकन्या दिसते. हा मोठाच घात झाला. या लोकांनीं आम्हाला घेरलं, आतां पळायलाहि अवकाश नाहीं. ही पहा ती स्त्रीच पुढें आली.

(राजसत्ता आपल्या परिवारासह दृष्टीं पडते.)

राजसत्ता (पुढें येऊन राजनिष्ठेला)—

(चाल—युवराज शिवाजी.)

येथ अशी एकलि तूं कवण सुंदरी ॥ येशि कुठुन जाशि कुठं या वनांतरीं ॥ वनदेवी तूं तंवो भासशी मला ॥ परि झालिस कां न कळे, अशि भयाकुला ॥ व्याघ्रभयें हरिणि जशी दिससि घाबरी ॥ येथ अ० ॥

राजनिष्ठा—बाई, मी इथं एकटीच नाहीं. (असंतोषास दाखवून)—

(चाल—अरसिक किति हा०)

राक्षस कीं हा मेला ॥ आहे या स्थलिं मम संगतिला ॥ आपुल्या दुर्बुद्धीला ॥ बघतो मज तो बळि द्यायाला ॥ रक्षाया परि मजला ॥ प्रभुनं धाडियलं तुह्माला ॥

राजसत्ता–मुली, भिऊं नकोस. जशी याची दुर्वासना तसाच हाहि राक्षस तुला आतां बिलकुल उपद्रव देणार नाहीं, असा मी पक्का बंदोबस्त करत्यें. (आपल्या शिपायांस) अरे, पकडा याला. आन् चांगला जखड बंध करून चला बरोबर घेऊन. बरं मुली, तुझं नाव काय बरं ?

राजनि०–मला राजनिष्ठा म्हणतात.

राजसत्ता–काय ? राजनिष्ठा तूं ? म्हंजे आज बरेच दिवस नाहींशी झाल्याचं ऐकलं होतं, ती महानुभव विचारस्वातंत्र्याची मुलगी ?

राजनिष्ठा–होय. तीच दुर्दैवी.

राजसत्ता–अथवा शंकाच नको—

(अंजनीगीत.)

ऐकियली मी होती जैशी ॥ सुलक्षणिच ही आहे तैशी ॥ पाहतांहि जरि सभयचि ऐशी ॥ धन्य पुण्य दिसते ॥

—पण तूं एकाएकीच नाहींशी होऊन आतांपर्यंत अशी होतीस तरी कुणीकडे ?

राजनिष्ठा–मला या असंतोषानं आमच्या बागेंतून उचलून राजद्रोहाच्या बंदींत कित्येक दिवस नेऊन ठेवलं होतं. आतां तिथनं मला माझ्या घरीं पांचवर्ण्याचं मिष करून हा आपली दुर्वासना तृप्त करण्याकरितां मला या घोर अरण्यांत घेऊन आला. पण बाई, तुम्हाला कधींच कुठं मी पाह्यलं नसतां अगदीं ओळखीच्या माणसाप्रमाणं माहिती विचारतां हें कसं ?

राजसत्ता–तूं मला पाह्यली नसशील, तरी नांवानं ओळखशील. मी महाराणीविजयिनीची मुलगी राजसत्ता आहे.

राजनि०–(तिला आलिंगून)—अहाहा !

(चाल—सकल पुराणांचे०)

आर्य मंडलस्थ या प्रजेचे ॥ रक्षणार्थ अति समर्थ जीचें ॥ राज वेत्र त्या महाराज्ञिचें ॥ प्रति रूपचि घबत्यें ॥ आश्रय आह्मा उत्कर्षाचा ॥ अस्त शासन प्रभाव जीचा ॥ तिचा कर स्पर्श हा सुखाचा ॥ पर्यायें घडला ॥

बरं पण, तुम्ही अशा इकडे कुणीकडे ?

राजसत्ता—आतां भाग्योदयपर्व आलं आहे. त्या निमित्तानं ईशप्रसाद स्वामींच्या दर्शनाला मी जात आहे. पुढें आईसाहेबांची स्वारीहि गेली आहे.

राजनिष्ठा—इकडे का आहे तो आश्रम ? बाबांच्या तोंडून मी त्यांच्याविषयां पुष्कळच ऐकलं आहे. पण अजून दर्शन झालं नव्हतं. तो हा योग चांगलाच आला ह्मणायचा !—

(साकी.)

सोसुनि कष्ट परोपरि जैसी प्रसादार्हता यावी ॥ त्यानंतर गुरुकृपादृष्टिची अमृतवृष्टि व्हावी ॥ ऐसें हें घडतें ॥ भाग्याचि ये मम उदयातें ॥

—बरं, आमच्या बाबांकडची माहिती असेलच तझ्माला. सर्व सुखरूप आहेत ना ? तेहि आतां इकडे येतीलच ?

राजसत्ता—(खिन्नमुद्रेनें)—होय. मोकळे असते तर आलेच असते.

राजनि—(घाबरून)—म्हंजे ? असं काय तें ? मला नीट सर्व सांगा.

राजसख्या - चल आतां वाहिनं सर्व सांगत्यें.

राजनि०—(गाहिवरून)—अगबाई !—

(चाल—हतभागी मी ठर०)

विपरित कांहीं नसावें ॥ परि पातकि मी ॥ काय दुजें परिसावें ॥ कुशल तरि तें त्यांना दैवें ॥ आतां ठेवावें ॥ हाय हाय हाय हाय ॥ विप० ॥

राजसख्या—गडे पण तूं अशी अगदीं घाबरूं नकोस. तुझी ही अवचित गांठ पडून हा दुष्ट राक्षस माझ्या हातीं सांपडला हें फारच उत्तम झालं आहे. तुमच्या कुळावर सध्यां जीं अनेक तुफानं उठलीं आहेत, त्यांतलं तूं नाहींशी झाल्या संबंधाचं एक तुफान तरी आतां हा प्रत्यक्ष असतांषच आईसाहेबांच्या स्वाधीन करून मला सहज घालवितां येईल. खरोखर सांगत्यें—

(भुपाळी.)

सार्थाचि होइल भाग्योदय हें पर्व असें दिसतें ॥ भाग्य खचित तें सकलांचें ही आणिल उदयातें ॥ भेट अकल्पित अपुली

ऐशी वाटे उदयाची ॥ उषः कालिन प्रभाक्त
सुखमय येत पुढें साची ॥ (जातात)

प्रवेश पांचवा.

(पात्रें, विक्षोभ व रक्तपात घाबऱ्या घाबऱ्या प्रवेश करतात.)

रक्तपात—कायरे बुवा ? आतां कसं काय करायचं ?

विक्षोभ—हें काय बाबा विचारायचं ? आतां इथनं एकदम पळायचं, नाहीं तर त्या असंतोषाप्रमाणं फांसावर चढून मरायला तयार व्हायचं !

रक्तपात—पण कायरे, हें सगळंच पारडं एकदम कसं फिरलं ?

विक्षोभ—तें कांहीं बोवा विचारूं नकोस. पुंण्याईच जबरदस्त खरी त्या विचारस्वातंत्र्याची. गृहस्थाच्या वाईटावर एकीकडनं आपण व दुसरीकडनं ती एकतंत्रादि मंडळी कशी शिकस्त करून होतों. पण खुद्द राणी विजयिनीच्याच हातीं आपला असंतोष अचानक सांपडून ईशप्रसाद स्वामींच्या आश्रमांत

नाचन. तुखानं सर्व खरा खरा प्रकार बाहेर पड-ल्यामुळं एकंदर बनाव फसून सर्वांची फजीती झाली !

रक्तपात—मग आतां इथनं काळं करायचं, हेंच ठरलं !

विक्षोभ—आज कधीं पासनं झालेलंच आहे तसं. पण एखाद वेळ अशा कोणा एकतंत्री मंडळीची धामधूम सुरु असली म्हणजे त्यांच्या आड या लोकां-मध्यें असंतोष, रक्तपात विक्षोभ वगैरे आपल्या राज-द्रोही मंडळास सहज फावत असे; पण यापुढें तोहि संभव राहिला नाहीं. मी आतां ऐकलं आहे त्याप्रमाणें राजनिष्ठा राजपुत्र युवराजास व राजसत्ता लोकमतास मिळून त्यांचा विवाह ईशप्रसाद स्वामींचा सन्मुख झाला म्हंजे, त्या एकतंत्रास जशी राजसत्ता मिळवतां येणार नाहीं, तशीच ती राजनिष्ठाहि आपल्याला, विचारस्वातंत्र्याचा सूड घेण्याकरितां पुनश्च पळवतां ये-णार नाहीं !

रक्तपात—तर मग चलाच आतां. झालेल्या गड-बडींत असंतोषानें आपणहि जोड गुन्हेगार ठरलों आ-होंतच; तेव्हां आपल्या बचावासाठीं आतां सक्त प्रयत्न

चालू राहतील. तेव्हां यापुढें इथें पूर्ववत गुप्तसंचार दिखील मोठ्या धोक्याचा होणार आहे. तेव्हां आतां निसटावें हेंच बरें !—

(गाणें.)

असो आतां हा सर्वां नमस्कार ॥ पुन्हा न दृष्टिस पडूं नमस्कार ॥ करूं कृष्ण मुख चला नमस्कार ॥ फिरूं गुप्तहि न इथें नमस्कार ॥ पळून हें चाललों बघा ॥ अखेरचा हा ॥ घ्या ॥ अमुचा ॥ नमस्कार ॥

(दोघे पळत निघून जातात.)

प्रवेश सहावा.

(स्थळ, ईशप्रसाद स्वामींचा आश्रम.—पात्रें, ईशप्रसाद गुरू मध्यभागीं असून एकीकडे महाराणी-विजयिनी, युवराज, राजसत्ता वगैरे व दुसरीकडे राष्ट्रजागृती, विचारस्वातंत्र्य, मुद्रणकला, लोकमत, राजनिष्ठा, देशाभिमान वगैरे. असा देखावा.)

सर्वजण—(उमे राहून)—

(चाल—मुला सांग नृप०)

अहा ! धन्य हा सुदिन भाग्योदयाचा ॥
स्वामि सद्गुरूंचिया दर्शनाचा ॥ अहा० ॥

विचारस्वातंत्र्य वगैरे—

.........होति कांहीं अशी ग्रहदशा आ-
मुतें ॥ भोगुनी संपली इष्ट झालें ॥.........

राणी विजयिनी—

.........असंबुद्धिच अम्हा ॥ अंध बधिरहि
करी ॥ गुरु कृपौषध हरी दोष अमुचा ॥...

सर्वजण.—

अहा धन्य हा दिवस भाग्यो० ॥

ईशप्रसाद—राणीविजयिनी, भगवति राष्ट जाग्रती, हे महानुभव विचारा, बसा. तुम्ही सर्व बसा. हें पहा, झाला जो प्रकार तोहि एक बराच म्हणावा. कारण उभय राष्ट्रांस हितावह असा जो हा तुमचा सख्य संबंध भगवदिच्छेनुरूप जडला आहे, त्याच्या सदृढतेला बाधक असा उभयराष्ट्रांतहि क्वचित कोठें

असलेला खळमळ या तऱ्हेच्या कांहीं रूपानें बाहेर पडून निघून जायला पाहिजेच असतो. त्याप्रमाणें तो पडला हें बरेंच झालं आतां यांत तुम्हाला थोडे क्लेश भोगावे लागले खरें, पण शरीरगत एखादी व्याधि कशाहि दिव्यौषधांच्या योगानें बाहेर पडायची असली तरी शरीरास ती कांहींना कांहीं यातना दिल्याशिवाय निःशेष निघतच नाहीं !

राणीविज०—या सर्व यातनांचा भार केवळ माझ्या गुरुबंधूवर व त्याच्या परिवारावरच पडावा, याबद्दल मला वाईट वाटतें.

विचारस्वा०—पण हे क्लेशच या वेळीं आम्हावर राणीचा विशेष अनुग्रह होण्याला कारण झाले आहेत त्यामुळें त्यांजविषयीं आतां कोणालाच खेद नको.—

(चाल— बाई तूं या आम्र०)

कष्ट प्राप्ति मुळें राशीतें ॥ झाली प्रिंयत या समयातें ॥ व्यसनें श्रम ही जरा बहु देती प्रेमोद्भवही स्वजनीं करिती ॥ कष्ट० ॥

ईशप्रसाद्-शिवाय अशाप्रकारचे सर्व आगंतुक भार मधल्यामध्यें आपण सहन करून नाहींसे करण्याकरितांच मुळीं हा विचार व ही जाग्रती या भावंडाची या आर्यमंडळांत योजना झालेली आहे. यांच्या या कष्टांचें परिमार्जन इतकेंच कीं, मागल्या अनुभवावरून तींच अमंगळें पुन: न उद्भवतील अशी पुढें सावधगिरी ठेवावायची म्हंजे झालें. राजसत्ता लोकमताला आणि राजनिष्ठा युवराजाला देण्याचा आपला पूर्वसंकेत जो तूं याबेळीं सफल करण्याचा निश्चय केला आहेस त्यानेंच बहुतेक असल्या अनिष्ट गोष्टींचा परिहार यापुढें होणार आहे.

राणी विज०-राजसत्ता व लोकमत हीं परस्परावर पूर्वीच अनुरक्त झालीं आहेत.

विचार०-आणि ऐनप्रसंगीं मोठ्या संकटांतनं वांचवून आजच्या राजनिष्ठेला राणीनें आपल्या पदरीं घेतलीच आहे.

लोकमत-(पुढें होऊन)—

(चाल-सिंध भैरवी-)

होति कृपा श्री गुरुची खरी ॥ राज्ञिहि लोभ उदंड करी ह्मणुनि महत्पद मजासि मिळे ॥ राहुं कृतज्ञचि हे सगळे ॥ इच्छा आतां हीच करूं ॥ सदा प्रसादा पात्र ठरूं ॥

राजनि०— (पुढें होऊन—

(चाल—मी तुमची अ०)

थोर अनुग्रह झाला ॥ भाग्य काल हा खचित उदेला ॥ थोर० ॥ महाराज्ञिचें पदरीं पडल्यें ॥ सुखाभ्युदयकर नातें जडलें ॥ आशेचें परम स्थल मिळलें ॥ आनंदचि सकलांला ॥ थोर० ॥

मुद्रण-(गाहिंवरून)-अशा आनंदाच्या प्रसंगीं माझी शांति मला—

ईश प्रस्ना०—तुमची शांति सुखरूप आहे. भगवतमत्तेनें ती पहा पुनः तुमच्यांत नांदायला अदृश्य लोकींहून येत आहे.

(शांती विमानांतून खाली उतरते.)

सुदृण०—(आनंदानें शांतीला पोटाशीं धरून)—

(चाल—वेषाचें सार्थक कि०)

भेटे मज शांति पुनः येउनी अशी ॥ वाटे ती सुख शोभा प्राप्त मूर्तशी ॥ हर्षभरें कढ पहा येत दाटुनी ॥ दुःखार्णव आज अखिल जात आटुनी ॥

राजनिष्ठा—(शांतीस)—

(चाल—प्रभुला ईश्वर वि०)

ये भेटु गडे शांते ॥ पुनरपि नांदुं सुखें पथें ॥ भूषण होऊं उभय कुलां ॥ साधन हि सुखोत्कर्षाला ॥ प्रिय होउनि यां राहुं सकलांतें ॥ ये भे० ॥

—ईशप्र०—आजच्या या भाग्योदय पर्वकाळीं जो हा मंगल प्रकार झाला याचा प्रभावच असा आहे कीं, ह्यापुढें शांति, समृद्धि, उन्नति, असलीच अपले तुमच्यांत सुखानें वाढलेलीं दृष्टीस पडावीत. बरें, विचार, आपला आतां तुह्मी काय इच्छा आहे.

विचार०—दुसरी काय असायची आहे ?—

(चाल—धन्य तूंच विभुव०)

राजछत्र सततचि हें विजयिनिचें राहो ॥
देशसमुन्नतिस हा तदाश्रयेंचि लाहो ॥ विद्या-
गुणबल समृद्ध जनसमाज होवो ॥ दैन्य रोग
दुर्भिक्षादिक लयास जावो ॥ ईश्वर प्रसाद-
युक्त पर्व नित्य येवो ॥

—ईश०—तथास्तु !

(पडदा पडतो.)

समाप्त.

नाटकाचें थोडक्यांत तात्पर्य.

(चाल—कर जगदीश्वर हमपे०)

जनरंजनपर जरि ही नाटककृति केली ॥
निज भावी भाग्यासाहि सूचक ही झाली ॥ ज.
आर्यांग्लग्रंथि हाच ईश्वरी प्रसाद ॥
अभ्युदया हा उभयां कारण संबंध ॥
प्राप्त तया पासूनिच शांतिसुखास्वाद ॥
ह्मणुनी । जपुनी । दृढतो करतां ॥
भाग्य-उदय होय हीच पर्वणि जणुं आली ॥
खचित यथाकालीं ॥ जन० ॥